# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. १७/०४/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा सोमवार दिनांक १७/०४/२००६ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. १०/०४/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सभापती |
| २) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. मिलन गोविंदराव पाटील | सदस्य |
| ५) | श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर | सदस्य |
| ६) | श्री. केशव रामभाऊ घरत | सदस्य |
| ७) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ८) | श्रीम. प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| ९) | श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| १०) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ११) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| १२) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| १३) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| १४) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापती पदी आजच्या सभेकरिता श्री. मोहन पाटील ह्यांनी स्थानापन्न होण्याकरिता सुचवित आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मोहन पाटील :-**

आपल्याला सर्वांच्या मान्यतेने मी आसन ग्रहन करत आहे.

**केशव घरत :-**

सचिव साहेब, इतिवृत्तांत वाचताना मला काही प्रश्न विचारायचे आहे. नंतर इतिवृत्त पूर्ण झाल्यानंतर विचारु?

**मा. नगरसचिव :-**

आपल्याला इतिवृत्त कार्यवाहीबद्दल विचारायचे आहे ना तर इतिवृत्त पूर्ण झाल्यावर विचारावे.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्यांच्या ज्या अडचणी आहेत ते पेजव्हाईज विचारतील ना.

**मा. सभापती (मोहन पाटील) :-**

सचिवजी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी.

(मा. नगरसचिव यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब विषयाला सुरुवात करण्यापूर्वी महत्वाचे काही दोन-चार मुद्दे आहेत. ते मुद्दे आपल्या निदर्शनात आणून देतो. साहेब आपल्या महापालिकेत आरोग्य विभाग आहे, बांधकाम विभाग आहे, पाणी पुरवठा विभाग आहे. या सर्व विभागांचे आपसात कॉडीनेशन नाही का? कारण की, शनिवारी आपल्या सिल्व्हर पार्कच्या पाण्याच्या टाकीवर फायर स्टेशनचे बांधकाम करताना, फाइलिंग करताना आपली इनलेटची पाईप लाईन तुटली. साहेब, हे जर आऊटेलेट तुटली असती तर ४ एम.एल.डी. पाणी, आपण त्या टाकीतले पाणी कसे

सोडले असते? आणि फाइलिंग करताना त्यांना प्लान दिला नाही का? की कुठे फाइलिंग करावे आणि कुठे पाईप लाईन आहे. जर ती आऊटडेटची पाईप लाईन तुटली असती तर फार मोठा भयंकर प्रसंग घडला असता व पूर्ण मिरा भाईंदर शहराला पाणी मिळाले नसते आणि ४ एम.एल.डी. पाणी पाण्याच्या टाकीतुन आपण कसे काय काढले असते? त्यांच्यामध्ये सुसूत्रता नाही का? जशी नाल्यांची कामे भाईंदरमध्ये चालू आहेत. त्याच्यामध्ये आरोग्य विभागाचे काही कन्सलंट आहे की नाही? साहेब, आज तिथे नाल्याचे बांधकाम करताना पाईपलाईन मध्ये येते व पाईपलाईन तुटते आणि संपूर्ण परिसरामध्ये खराब पाणी जाते. त्याच्यामुळे ही जी गॅस्ट्रोची साथ लागलेली आहे. त्याच्यामुळे खराब पाणी आलेले आहे. आपल्या महापालिकेत कुठल्याही डिपार्टमेंटचे कुठल्याही डिपार्टमेन्ट बरोबर आपआपसात कॉर्डीनेशन नाही आणि सिल्व्हर पार्कला महत्वाचे आहे. आणि तिथे संपचे ही बांधकाम चालू आहे. मोठा संप आहे. मोठी पाण्याची टाकी आहे. जर समजा फाइलिंग करताना तिथे जर काही झाले तर ते आपल्याला किती महागात पडेल? आणि जो पाण्याचा त्रास आहे संपूर्ण मिरा भाईंदर शहरामध्ये, मुंबईमध्ये, ठाण्यामध्ये त्यामुळे आणखीन जनतेत असंतोष उडेल आणि आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये पाण्यामुळे बरेच आंदोलन झाले होते. मग हा असा प्रसंग पुन्हा घडू शकतो.

**मिलन पाटील :-**

साहेब, सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी जे सांगितले ती सत्य परिस्थिती आहे. ह्याच्यावर गांर्भीयाने विचार करायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

फक्त आपण यासाठी बोलायचे की, ह्याच्यावर काय करणार? अधिकाऱ्यांना बोलवता की, काय करता?

**प्रेमनाथ पाटील :-**

अधिकाऱ्यांना बोलवून घ्या.

**गजानन भोईर :-**

अधिकाऱ्यांना बोलवा ना आणि ह्याच्यापुढे काय? आम्ही प्रश्न विचारतो त्याचे शेवटी उत्तर काय?

**मा. सभापती (मोहन पाटील) :-**

उपायुक्त साहेब, बांधकाम विभागाचे आणि पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांना एकत्रित बोलावून इतिवृत्तांताचा विषय झाल्यानंतर आपण चर्चा करा आणि चर्चेचा अतिशय महत्वाचा विषय असा आहे की, शहरामध्ये जर ४ एम.एल.डी. पाणी आले नसते तर शहरामध्ये एक वेगळा मॅसेज गेला असता आणि सुसूत्रता आहे की नाही? जी सुसूत्रता पाहिजे ती सुसूत्रता आपला आरोग्य विभाग असू दे, बांधकाम विभाग असू दे किंवा अन्य कोणतेही विभाग असू दे त्यांच्यात सुसूुत्रता नाही. असे आपले अनेक विषय आहेत की ते काम सुरु करताना प्रत्येक विभागाला विचारुन केले पाहिजे. पण ते काम केले जात नाही. ह्याच्यापुढे प्रशासनाने याबाबतीमध्ये खबरदारी घेतली पाहिजे आणि खबरदारी घेऊन आपण काम केले पाहिजे आणि कॉडीनेशन झाले पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

सभापती साहेब, प्रभाग क्र. २६ मध्ये तीन दिवसापासून घाण पाणी येत आहे. आणि मी संबंधितांना फोन केल्यावर त्यांच्याकडून असे उत्तर येते की, इंदिरा कॉम्प्लेक्सकडे वॉल बसवायचा आहे म्हणून असे पाणी येत आहे. याप्रकारे बोलून चालणार का? वॉल बसवणार म्हणजे घाण पाणी येणार का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, असे आहे की जो ठेकेदार काम करतो तो मुळातच पाणी विभाग, आरोग्य विभाग ह्यांच्याशी कन्सल्ट करत नाही.

**कैलासबेन जानी :-**

तीन दिवस झाले घाण पाणी येत आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तिथे पाईप लाईन आहे की नाही? आणि सरळ ती पाईप लाईन तुटते आणि लिक होते आणि संपूर्ण गटाराचे पाणी त्या पाईप लाईनमध्ये जाते. हे फॅक्ट आहे. कारण की माझ्या समोर तीन ठिकाणी क्रॉस कनेक्शनचे काम चालू आहे. त्यादिवशी सिल्व्हर पार्कला गेलो होतो तर हा इनसिडन्स मी बघितला. मग जेणेकरुन आपला बांधकाम विभाग, आरोग्य विभाग व बाकीचे डिपार्टमेन्ट ह्यांच्यात कॉडीनेशन आले पाहिजे.

**कैलासबेन जानी :-**

रिपेरिंग करित आहेत असे द्यायला पाहिजे की नाही? पाईप लाईनमध्ये ते पाणी जाते. तीन दिवस झाले. सतत फोन करते तर असे उत्तर मिळते की, वॉल बदली करण्यात येत आहे म्हणून गढूळ पाणी येत आहे. उद्या चांगले पाणी येईल. पण उद्या काय येत नाही. तीन दिवस झाले सतत गढूळ पाणी येत आहे.

**केशव घरत :-**

साहेब, माझा असा प्रश्न आहे की, घोडबंदर रस्त्याचे काम सुरु आहे आणि घोडबंदरला ही जी इनलेट आहे. टाकीपर्यंत जाणारी आपल्या मेन लाईनवरुन ती फार छोटी आहे. मला वाटते दिडशेची आहे तर ती बदला आणि ती सिमेंटची आहे ए.सी. लाईन आहे. तर त्यासाठी मी पाणी पुरवठ्याशी संपर्क साधला

असता त्यांनी सांगितले की, उद्या रस्ता झाल्यानंतर ती लाईन परत बदली करायची असेल व आपली टाकी आता मोठी होत आहे. सात लाख लिटरची. तर त्यासाठी तीनशेची लाईन टाकण्यात यावी असे मी पत्र दिलेले आहे. परंतु, पाणी पुरवठा विभागाचे म्हणणे आहे की, ती स्टेमची लाईन आहे आणि ते स्टेमवाले बदलणार. त्यांनी टेन्डर काढलेले आहे व त्याची तारीख ३१ मे दिलेली आहे आणि रस्त्याचे काम आता सध्या सुरु आहे. ३१ मे पर्यंत रस्ता पूर्ण होईल आणि नंतर परत तो रस्ता खोदला जाईल का? काम जर बरोबरीने झाले असते तर तसाच एक प्रश्न आहे या बी.एस.इ.एस.च्या येथे नाल्याचे काम झालेले आहे, पण अर्धवट राहिलेले आहे, पाईप उंच करायचे आहेत. त्यांना स्टेमवाल्यांना अजूनपर्यंत वेळ मिळत नाही. आणि तो नाला अर्धवट झालेला आहे. एकीकडेच झालेला आहे आणि पूर्ण व्हायला पुढचा भाग तसाच आहे. आणि त्याच्यातुन जर एवढे करुनसुध्दा पावसाच्या पाण्याचा निचरा होणारच नाही. ते काम झालेले आहे ते अर्धवट झालेले आहे.

**मोहन पाटील :-**

स्थायी समितीचे सभापती साहेब आलेले आहेत त्यांनी आपले स्थान ग्रहन करावे.

**मा. सभापती :-**

आमदार साहेबांनी राष्ट्रवादीचे काही प्रश्न विचारण्यासाठी बोलावले हाते. मी तिथे गेलो होतो. म्हणून मला यायला वेळ लागला. त्याकरिता मी खेद व्यक्त करित आहे.

**केशव घरत :-**

साहेब, माझे असे म्हणणे आहे की, स्थायी समितीच्या सदस्यांचा एक दौरा किंवा सभा त्या स्टेम प्राधिकरणाकडे ठेवा. कारण स्टेमवाल्यांकडून आपल्याला काही मिळत नाही आणि ते आपल्याकडून पूर्ण पैसे घेतात. लाईटचे इश्यु करतात की, लाईट नव्हती म्हणून पंप बंद होते. पंप बिघडले आणि पंप बिघडेपर्यंत त्यांच्या स्टोरला नविन एकही पंप नसतो का? हे जे प्रकार आहेत ते आपल्याकडून पैसे तर पूर्ण घेतात आणि आपले पैसे तर त्यांच्या अंगावर आहेत. मग हे प्रकार का होतात? आमचे म्हणणे आहे की सगळ्या सदस्यांचे एक शिष्टमंडळ स्टेम प्राधिकरणाच्या समवेत एक सभा लावावी.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदय, आपल्या परवानगीने बोलू इच्छितो की, सन्मा. सदस्य केशव घरत ह्यांनी विषय मांडलेला आहे व मघाशी चर्चेमध्ये पाईप लाईनचा विषय निघाला होता की स्टेम प्राधिकरणाच्या अधिका-यांची सभा स्थायी समितीमध्ये आपण लावा. स्थायी समितीच्या सदस्यांना घेऊन आपले जे शहराचे प्रश्न आहेत आणि त्याच्यामध्ये काही पाईप लाईन चेंज करायचे आहेत आणि आता काही ठिकाणी वेळेमध्ये पाणी येत नाही. जो शट डाऊन म्हणून बोलतो. त्यावेळेला आणि जी पॉवर महाशशंत ती पॉवर त्यांनी सुरु केली आहे. त्यामुळे कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर येथे वीज जाते आणि नेहमी हा प्रश्न निर्माण होतो की आणि संपूर्ण शहरामध्ये आज असा प्रश्न निर्माण झाला आहे की पाणी चांगले असूनही पाणी व्यवस्थित येत नाही. कारण आपल्याला माहित आहे. उन्हाळ्याच्या दिवसामध्ये जवळजवळ डॅमची पातळी ही दोन फुट, तीन फुट, चार फुट अशी घसरते. जास्त ऊन आल्यानंतर तेव्हा पाणी कमी मिळते. पण आज ती परिस्थिती निर्माण झाली नाही . त्याच्या अगोदर ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून सभापती महोदय आपण या स्टेमच्या प्राधिकरणाचे जे अधिकारी आहेत त्यांना बोलवून घ्या. स्थायी समितीच्या दालनामध्ये एक सभा बोलवून त्यांच्याबरोबर जी काही चर्चा करता येईल तशी चर्चा करुन सन्मा. सदस्यांच्या समाधानापेक्षा नागरिकांना जी गैरसोय निर्माण झालेली आहे त्याच्यावर पुर्णतः तोडगा काढता येईल अशी मी आपल्याला सुचना देत आहे.

**मा. सभापती :-**

संबंधित आपले आयुक्त साहेब, उपायुक्त साहेब यांना सांगितलेले आहे की आपल्याला खरोखरच स्टेमच्या अधिका-यांशी सभा घेतली पाहिजे आणि आपल्या माहितीकरिता सांगतो प्राधिकरणाचे जे सहा पंप बंद होते ते पंप ताबडतोब रिपेअरिंग करण्यासाठी तातडीने पत्र दिले व त्यांच्या संबंधित अधिका-यांशी मी स्वतः बोललो आणि ठाणे महापालिकेच्या मा. महापौरांसोबत ही बोललो. हे काय चालले आहे? प्राधिकरणाकडे पैसे असूनसुध्दा काम का होत नाही. आपले अधिकारी श्री. बारकुंड ही सोबत होते आणि आपण त्यांना तातडीचे तसे पत्र ही दिलेले आहे व त्याची एक प्रत मुख्यमंत्री साहेबांकडेसुध्दा दिलेली आहे. तरीसुध्दा आपण समोरुन एक सभा बोलावली पाहिजे.

**एस. ए. खान :-**

साहेब, स्टेमची सभा बोलावली पाहिजे.

**रतन पाटील :-**

साहेब, एकाच वेळेला सहा ते सात पंप बंद झाले याचा अर्थ काय? कशामुळे बंद पडले? आपल्याकडे स्टॉक म्हणून दुसरा पंप नाही का?

**बालीजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पाणी पुरवठा कार्यकारी अभियंता याबाबतीमध्ये खुलासा करत आहे.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की स्टेमबाबत ब-याच वेळा चर्चा झालेली आहे. पंप नादुरुस्त होणे त्याच्यामुळे पूर्ण शहराची अडचण निर्माण होणे त्याबाबत मी मा. आयुक्त साहेबआणि मा.

महापौर मॅडम आम्ही कार्यकारी समितीच्या आणि गर्व्हनींग समितीच्या मिटींगमध्ये हे मुद्दे उपस्थित केलेले होते. सप्टेंबर महिन्यापासून माझी स्वतःची पत्र आहेत की, अचानक पंप बंद पडले की, परिस्थिती निर्माण होऊ शकते आणि त्यामुळे स्टॅन्ड बाय पंपं हे दुरुस्त करुन घ्यावेत. परंतु, तिथे सहा-सहा महिने पंप बंद होते आणि २४ तारखेला आपल्याकडे १५ तासाचा शट डाऊन झाला आणि पाणी चालू झाले. आणि २५ तारखेला एक पंप बंद पडला आणि लगेच २७ तारखेला दुसरा पंप बंद पडला. फक्त चार पंप चालू होते आणि आपण सप्टेंबर महिन्यापासून प्रयत्न केले होते. परंतु, तिथे असणारे कार्यकारी अभियंता त्यांच्या केवळ निष्काळजीपणामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. भिवंडी, ठाणे आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेसाठी याबाबत मी माझा चार पानांचा अहवाल ठाणे आयुक्त आणि स्टेमचे सदस्य सचिव जे डी.एम.सी.चे सिटी इंजिनियर आहेत. श्री. लाला साहेब यांना दिलेले आहे आपल्या आयुक्त साहेबांना दिलेले आहे. आपल्या स्थायी समितीने जर कार्यकारी अभियंता श्री. कोसे साहेबांना येथे बोलावून काही उपयोग होणार नाही. स्थायी समितीचे सदस्य सचिव श्री. लाला साहेब हे सिटी इंजिनियर आहेत. त्यांची भेट घेणे योग्य ठरेल आणि त्यांना भेटल्यावरच पुढे काही तरी होण्याची शक्यता आहे. अन्यथा श्री. कोसे साहेबांना येथे बोलावून काही निष्पन्न होणार नाही. तुमचा वेळ वाया जाईल आणि त्यांचाही वेळ जाईल. श्री. लाला साहेबांची भेट घेऊ. आता मी फोन करुन त्यांना विचारतो.

**मोहन पाटील :-**

श्री. लाला साहेब येऊ शकत नाहीत.

**शिवाजी बारकुंड :-**

ते सदस्य सचिव आहेत.

**मोहन पाटील :-**

ते का येऊ शकत नाहीत? स्थायी समितीने पत्र दिले, मा. महापौरांनी पत्र दिले आणि कमिशनर साहेबांनी सांगितल्यावर ते येऊ शकतील. सन्मा. सदस्य मी आपल्याला तिथली परिस्थिती सांगतो. मी त्या सगळ्या सभा अटेंड करतो. तर त्या सभेमध्ये श्री. कोसे जे आहेत ना ते नुसते बावला आहेत आणि तिथले लाला साहेब जे आहेत, सदस्य सचिव हे तिथल्या मा. महापौरांच्या अंडरमध्ये आहेत. श्री. सेठीच्या अंडरमध्ये आहेत. श्री. सेठी साहेब कमिशनर आहेत. त्यांच्या अंडरमध्ये ते आहेत. कारण त्या समितीवर तीन आपले सदस्य आहेत. मिरा भाईंदर, भिवंडी आणि ठाणे महानगरपालिका त्याच्यामध्ये जास्तीत जास्त शेअर कोणाचे आहे तर ठाणे महानगरपालिकेचे जास्त शेअर आहेत आणि श्री. सेठी साहेब एवढा दबाव टाकता. फक्त रडले सरेकर मार्ग काढतो. कोसे नुसते बावल बनत अगदी. असे अनेक प्रश्न निर्माण झाले. त्याच्यामध्ये आपले जे शेअरिंग असते. तिन्ही महानगरपालिकेमध्ये कॉडीनेशन आहे आणि तिन्ही महानगरपालिकेमध्ये आपला सर्वात लहान हिस्सा आहे. अधिकार आपल्याला सर्व सारखे आहेत. परंतु, ते फक्त कागदोपत्री दाखवायला आहेत. परंतु, ते लोक त्यांच्या पध्दतीने आपल्यावर अधिकार गाजवतात आणि आपले कोणतेही काम जर असेल, मिरा भाईंदर महानगरपालिकेचे काम करण्याची त्यांची क्षमता नाही. कारण त्यांची मानसिकता नाही. त्याच्यामुळे सदस्य सचिव येऊ शकतात किंवा त्यांना एक रिक्वेस्ट करा कारण त्याचे अध्यक्ष कोण आहे, तर ठाणे महानगरपालिकेचे महापौर अध्यक्ष आहेत. त्यांना आपण पत्रव्यवहार करुया आणि त्यांना सांगू तुमच्या गर्व्हरनर कमिटीची जी सभा असेल त्यावेळी तुम्ही आम्हाला अर्धा तास अगोदर बोलवा. आपण जाऊ या. सगळे तिथे भेटतील. त्यांच्याकडे आपण आपला प्रस्ताव मांडू. जर आमच्या मिरा भाईंदर शहरामध्ये आम्हाला एवढा पाणी पुरवठा मिळतो. आमची एवढी पाईप लाईनची क्षमता असूनसुध्दा तुम्ही आम्हाला पाणी देत नाही. अनेक कनेक्शन अगोदर त्याठिकाणी होती. ती काढण्याकरिता त्यांनी फार वेळ घालवला. आता पाईप लाईन नविन टाकलेली आहे. तेही काढण्याचे बाकी आहे. म्हणून ते कोणत्याही गोष्टीला ऐकत नाही म्हणून पिठसिन अधिकारी महोदय आपण त्यांची एक वेळ घ्या. त्यांची दर महिन्याला किंवा दिड महिन्यांनी मिटींग असते, त्या मिटींगच्या अर्ध्या तास अगोदर वेळ कळवा. असे पत्र स्टेमचे अध्यक्ष म्हणून पदसिध्द ठाणे महापौर आहेत त्यांना पत्रव्यवहार करु या. त्यांच्या सदस्य सचिवाला आपण पत्र देऊ या आणि त्यांची अर्धा तास अगोदर मिटींग घेऊ. कारण तुमचा प्रश्नही अतिशय महत्वाचा आहे. ते टेंडर मनमानी काढतात. त्यांना वाटेल ती मनमानी ते करतात. आपल्याला मानत नाही. हा आपला रेकॉर्ड आहे. बारकुंडजी ही परिस्थिती बरोबर आहे ना.

**प्रभात पाटील :-**

आपण एवढा एक-दिड महिना कशाला थांबायचे? येऊ दे ना जर ते येत असतील तर.

**शिवाजी बारकुंड :-**

ही परिस्थिती बरोबर आहे आणि आपण जे बोलता स्टेमचे तर गर्व्हनींग समिती आहे. ती सभा महिन्यानेही लागेल किंवा दोन महिन्यांनी ही लागेल. त्यांच्या अगोदर आपण त्यांना बोलावून घेऊ.

**मोहन पाटील :-**

मी तुम्हाला सदस्य सचिवांना बोलवण्यासाठी मघाशी बोललो ना.

**शिवाजी बारकुंड :-**

स्टेमचे अध्यक्ष हे ठाणे महापौर आहेत आणि........

**मोहन पाटील :-**

ठाण्याचे महापौर, त्यांची मानसिकता नाही आहे हे मी तुम्हाला सांगतो. त्यांची बिलकुल ही मानसिकता नाही.

**रतन पाटील :-**

ठाणे महानगरपालिकेचे महापौर मिरा भाईंदरच्या विषयावर आले होते. आमचे शिष्टमंडळ मिरा भाईंदरचे आपले चार नगरसेवक.......

**मोहन पाटील :-**

शिवसेनेचे.

**रतन पाटील :-**

मी असे बोलत नाही. आमच्या पक्षाची एक सभा होती त्यावेळेला आम्ही चारही नगरसेवकांनी महापौरांची भेट घेतली व मिरा भाईंदर महापालिकेच्या पाणी प्रश्नाच्या संदर्भात आम्हाला आपली वेळ पाहिजे. तर आपण स्टेमचे जे आहे त्यापध्दतीने जाऊया. कारण आम्ही त्यांच्यांशी या संदर्भात बोललो.

**मोहन पाटील :-**

कमिशनर महापौरांचे ऐकत नाही.  श्री. सेठी साहेबांचे सांगतो. मी दिड वर्षभर त्यांच्या बरोबर मिटींग घेत आहे.

**गजानन भोईर :-**

सन्मा. सदस्य मोहन पाटील आपण असे करा घोडबंदरच्या येथे डाकबंगला आहे. तिथे सकाळच्यावेळी सभा घ्या. कोणकोण येते ते बघू या.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांना बोलावून घ्या.

**गजानन भोईर :-**

डाक बंगल्यावर मिटींग ठेवा.

**मोहन पाटील :-**

लाला साहेबांना बोलावून घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

जे पंप नादुरुस्त आहेत पण आपण जे संप बांधलेले आहेत आणि त्या संपचे काम थांबलेले आहे. तर तुम्ही हा का विचार करत नाही की संपचे काम जर पूर्ण झाले तर आपल्याला हा प्रश्न ओढावणार नाही. कारण की आपल्याकडे स्टोरेज कॅपेसिटी वाढेल. पाणी जरी नाही आले तरी आपण त्या संपमधील पाणी घेतो ना. म्हणजे आपले संप का बंद आहेत? आज आपण ठराव केला आणि सांगितले की स्टेम अधिका-यांना जे आठ करोड रुपयांची कामं पेन्डीग आहेत ते लोन न घेता आपण महानगरपालिकेतुन ते पैसे द्यावेत असा आपण ठराव पास केला. स्थायी समितीमध्ये केला. मा. महासभेमध्ये केला. मग अजूनपर्यंत आपण त्या स्टेमला पैसे का देत नाही? साहेब हा जो एक्स्टेशन क्लॉज आहे हा क्लॉज १० ते २० टक्के आहे आणि ह्याचा बर्डन पालिकेवर पडतो आणि आपण त्या ठेकेदाराला काम थांबवल्यामुळे पैसे जास्त देत आहोत. एक्स्टेशन क्लॉजचे टेंडरमध्ये आहे. म्हणजे जो रेट वाढलेला आहे तर त्या रेट वाढीप्रमाणे आपण त्यांना एक्स्टेन्शन कशाला देतो? मग आपण त्यांना का काम फास्ट करुन देत नाही. आज दोन वर्ष झाली काम पेन्डीग पडलेले आहे, बंद पडलेले आहे. म्हणजे ते काम आपण अगोदर केले असते आणि आठ करोड रुपये जो आपल्या पालिकेतलाफंड होता तो जर आपण युज केला असता तर आपले पैसे वाचले असते. आज ते आपले पैसे वाचले असते ना आणि ह्या लॉसचे जिम्मेदार कोण?

**प्रभात पाटील :-**

हे अगदी बरोबर आहे. क्षमता कमी होत चालली आहे. आपल्याकडे साठवणूकच नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आज फायनानशियल लॉस आपल्या पालिकेतुन भरत आहोत ना. काम डिले झाल्यामुळे ठेकेदाराचे लॉस नाही. लॉस आपला होत आहे आणि ठेकेदाराला आपण ते पैसे भरुन देत आहोत. आपण ठराव ही पास केला मग आपण स्टेमला आणि एम.जी.पी.ला पैसे का देत नाही? रिझन काय?

**एस. ए. खान :-**

साहेब, पाणी पुरवठ्याकरिता सभा बोलावली पाहिजे. नाहीतर उन्हाळ्यात फार तकलीफ होईल.

**केशव घरत :-**

साहेब, काशिमि-याला शिवाजी महाराजांचा पुतळा आहे. तिथे हायमास्क लाईट लावलेली आहे. त्या लाईट संध्याकाळी सहा वाजता सुरु होतात. मी जवळजवळ पंधरा दिवस अगोदर श्री. जानकर हे इंजिनियर आहेत त्यांना फोन करुन सांगितले की असा असा प्रकार आहे. तरी आज पंधरा दिवसानंतरसुध्दा त्या लाईट चालू आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण श्री. जानकर इंजिनियरला सांगितले आणि मी संबंधित आयुक्तांना ही कल्पना दिली की, आपल्या अख्ख्या महाराष्ट्रामध्ये वीजचे लोड शेडींग चालू आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये काळोख आहे संपूर्ण महाराष्ट्राला उन्हाने त्रास झाले आहे आणि त्यांना लाईट नसल्यामुळे बिचारे बारा-बारा तास हैराण झाले आहे आणि आपण फक्त हायमास्क लावू नका.......

**रतन पाटील :-**

आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये जे रुंद रस्ते आहेत, चौपाटी आहे तिथे पूर्ण प्रकाश पूर्ण रात्रभर सगळ्या लाईट चालू म्हणजे विजेचे भारनियमन आपल्याकडे नाही का? आज जर आपण ती बचत केली व अकरा नंतर लाईट बंद केल्या तर मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अर्धे बिल कमी होईल. आज जे पाच कोटीचे जे बल आहे ते अर्ध्या पटीने कमी होईल. आपण नाही बोलू नका. आम्ही करुन दाखवू. स्ट्रीटवर जी लाईट आहे तर प्रत्येक स्ट्रीटमागे एक-एक स्ट्रीट लाईट बंद केली तर आपले बिल कमी होईल. त्याच्यावर कोणी लक्ष देत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण जे स्ट्रीट लाईटचे इलेक्ट्रीक बिल भरतो तर लमसम भरतो का मीटरप्रमाणे भरतो?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

लमसम भरतो.

**रतन पाटील :-**

काहीक ठिकाणी आठ-आठ, पंधरा-पंधरा दिवस लाईट बंद असताता तेसुध्दा चालू कम्पलेंट केल्यानंतर पंधरा पंधरा दिवसांनी येते. रात्री अकरानंतर ब-याचश्या स्ट्रीट लाईट बंद करा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, महत्वाच्या दोन बाबींचा याठिकाणी खुलासा करतो. शहरामध्ये जी विकास कामे होतात. उदा. बांधकाम, पाणी पुरवठा आणि आरोग्य विभाग ह्याचे समन्वय राहण्यासाठी मा. आयुक्त साहेबांनी यापूर्वीच आपल्या मुद्याच्या अनुषंगाने सुचना दिलेल्या आहेत यापूर्वीसुध्दा संबंधित विभागाच्या विभाग प्रमुखाने यासाठी समन्वय ठेवण्यासाठी त्यांना कटाक्ष ठेवण्याच्या अनुषंगाने निश्चित त्याची नोंद घेऊन कार्यवाही करु. दुसरा मुद्दा पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने होता. विशेषतः स्टेमच्या बाबतीत आपल्या ज्या अडचणी आहेत त्या अनुषंगाने सन्मा. सदस्यांची काही चांगल्या सुचना केलेल्या आहेत. आपले कार्यकारी अभियंता सहसचिव या योजनेतुन जे श्री. लाला साहेब आहेत त्यांच्याशी फोनवर चर्चा केलेली आहे. ते त्यांचा वेळ देणार आहेत त्यांचा वेळ दिल्यानंतर शासकीय अधिकारी आणि आपले सर्व सहकारी पदाधिकारी ह्यांची आपण एक संयुक्त बैठक घेऊन यामध्ये आपले जे प्रश्न आहेत सन्मा. सदस्य मोहन पाटील व इतर सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत त्या अनुषंगाने आपली एक सेपरेट बैठक त्याठिकाणी संपन्न करुन आपले प्रश्न मार्गी लावण्याचा आपण प्रयत्न करु. दुसरी महत्वाची बाब म्हणजे मा. महासभेने आपल्याला जो स्टेममध्ये आपला जो हिस्सा आहे, पैसा भरण्याचा, एम.एम.आर.डी.ए.चे लोन न घेता आपल्या फंडातुन पैसे द्यावेत अशी मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने आपण प्रयत्न करत आहोत. आतापर्यंत झालेले काम आणि पुढे करावयाचे काम याची शहानिश होऊन ती रक्कम वर्ग करावयाची आहे. त्याला प्राधान्य देऊन येणा-या काळामध्ये ते पैसेसुध्दा कामाची प्रगती विचारात घेऊन टप्याटप्याने अदा करण्याची कार्यवाही आपण करणार आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण एक टारगेट द्या ना. आज जवळजवळ सहा महिने झाले. आपण तो ठराव पास केलेला आहे पण त्याच्यावर अजून काही झालेले नाही. आपले म्हणणे बरोबर आहे की शहानिशा झाली पाहिजे. परंतु, एम.जी.पी. आणि स्टेम ॲथोरिटीने.......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते कागद देत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांचे म्हणणे अतिशय उलटं आहे. त्यांनी असे सांगितले की तुमचे मिरा भाईंदर कार्पोरेशन आम्हाला सहकार्य करत नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, खरं काय?

**मोहन पाटील :-**

आपल्याकडे दोन महत्वाचे मुद्दे असे आहेत की, बांधकाम विभागामधून काहीतरी आठ ते दहा कोटीचे वर (बिल) पैसे द्यायचे बाकी आहेत. तर ती बिलं अदा होत नाही. तर सभापती महोदय, त्याच्याने आपल्या बजेटवर इफेक्ट होणार आहे. दुसरा विषय असा आहे की, पाणी पुरवठा विभागामध्ये आपले जे रिझर्व्ह फंड आहेत आपण शक्य तो ते फंड तोडत नाही आणि जे पैसे मिळतील त्यापध्दतीने आपण काम करतो. आपली अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, रिझर्व्ह फंड काढले तर फायद्यामध्ये ठरेल. एम.एम.आर.डी.ए.चे आपण जर लोन मिळाले तर त्याचे व्याज आपल्याला परवडत नाही. त्याच्यामुळे ते आपल्या अंगाशी येणार

आहे. तसे असेल तर त्याची एक आढावा बैठक घ्या. त्यांची कोणती कामे आहेत आणि आपल्या रिझर्व्ह फंडातुन त्यांना पैसे वर्ग करु शकतो.

**शिवाजी बारकुंड :-**

मा. महासभेचा ठरावच तसा पारित झालेला आहे. जनरल फंडातुन पैसे उपलब्ध झाले तर जनरल फंडातुन द्यावे.

**मोहन पाटील :-**

जनरल फंडातुन नाही.

**शिवाजी बारकुंड :-**

अन्यथा पैसे उपलब्ध नसील तर रिझर्व्ह फंडातुन द्यावे असे मा. महासभेमध्ये ठराव झालेला होता.

**मोहन पाटील :-**

जनरल फंडातुन पैसे द्यायचे नाही. कारण मागची बिल अजून द्यायची आहेत आणि जवळजवळ ती दहा कोटी रुपयाची बिल आहेत आणि ती बिल तुम्ही दिली नाही तर बजेट कोलमडणार आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

आपण सेपरेट अशी मिटींग घेऊ.

**मोहन पाटील :-**

आपल्या बजेटवर आपण चार सभेनंतर सभा लागली पाहिजे. बजेटचे एक पुस्तक घेऊन आपण सभा लावली पाहिजे. त्याच्यावर आपल्याला पूर्णपणे आभ्यास करता येईल.

**रतन पाटील :-**

साहेब, मागच्या बजेटवर हेसुध्दा प्रश्न आले नाही. मागची अजून बिल बाकी आहेत. आता आपण बोलता म्हणून समजले. बजेटच्या चर्चेच्या दरम्यान आपण जेव्हा बसलो होतो तेव्हा दहा कोटी आपले जुने बाकी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

दहा कोटी आपण देतोय.

**मोहन पाटील :-**

पूर्णपणे लेखा परिक्षक, लेखा अधिकारी हे स्थायी समितीच्या अंडरमध्ये आहे आणि कमिशनरच्या निर्देशच्या अगोदर तुमचे निर्देश त्यांना पाळावे लागतील. ही वस्तुस्थिती आहे. जसे सचिवांना आपले पहिल्यांदा काम करायचे असते. कमिशनरचे निर्देश आहेत? ते आपले निर्देश दिल्यानंतर त्यांच्या निर्देशाचा विचार केला जाईल. म्हणून जे लेखा परिक्षक, लेखा विभाग आहे तो संपूर्णपणे आपल्या अंडरमध्ये असतो. आपण ज्यापध्दतीने बिल दिली पाहिजेत ती बिल का दिली गेली नाहीत. हे जाणण्याचा अधिकार तुम्हाला आम्हाला आहे. आता आपण काही गोष्टींचा विचार करतो की, त्यांच्याकडे बिले देतात आपली कामे होतात. ते काम आपण चालवून घेतो आणि आजपर्यंत चालवले आहे. आपण कधी आपल्या अधिकाराचा वापर केला नाही. आम्हाला आमच्या अधिकाराचा वापर करायला तशी वेळ आयुक्त साहेबांनी आणावी असा विचार आमच्या मनामध्येही नाही. परंतु, काहीक बाबींच्या गोष्टी ज्या आहेत त्या आपण तर सभागृहापुढे आणले नाहीतर त्याचा परिणाम वेगळा होता. आज दहा कोटीचे जर तुम्ही पुढच्या बजेटमध्ये दिले तर आपला गोंधळ होणार आहे. आपले बजेट कोलमडणार आहे.

**रतन पाटील :-**

तीन तीन महिन्यानी त्याची सभा व्हायला पाहिजे. लेखा परिक्षकाचा अहवाल तीन-तीन महिन्यांनी स्थायी समितीसमोर व्हायला पाहिजे.

**मा. सभापती :-**

जेव्हा आपण बजेट तयार करत होतो तेव्हा त्यांनी हा प्रश्न द्यायला पाहिजे होता ना. लेखा परिक्षकाने दहा कोटी रुपये द्यायचे बाकी आहेत. म्हणजे त्यांनी बजेट तयार करताना त्यावेळी आपल्यासमोर हा विषय का आणला नाही? की एवढी रक्कम बाकी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आणखीन एक प्रश्न असा आहे की, ३४ करोड रुपयाची डी.पी. रोडची कामं काढलेली आहेत. मग ती २००६-०७ मध्ये त्याचे पेडअप होणार आहे की २००५-०६ मध्ये आहे. आपण २००५-०६ मध्ये त्याची कामं काढलेली होती. म्हणजे त्याचे पेडअप २००६-०७ मध्ये करणार आहोत का? कसे करणार आहात?

**सुर्यकांत भोईर :-**

सभापती महोदय, ३१ मार्च पूर्वीची जी कामं आहेत जे टेंडर निघालेले आहेत, ती कामं आजपर्यंत सुरु झालेली नाहीत. मग ते लॅप्स होतील की ते ह्या बजेटमध्ये होणार आहेत?

**प्रेमनाथ पाटील :-**

३४ करोड कुठल्या ह्याच्यात घेणार ते पहिल्यांदा विचारा नाहीतर पुढची कामे होणार नाहीत.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन २००६-०७ मध्ये करणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

२००६-०७ मध्ये करणार मग बाकीची दुसरी कामे काय राहिली?

**सुर्यकांत भोईर :-**

मागच्या बजेटची कामं ह्या बजेटमध्ये करणार. तर ह्या बजेटमध्ये फरक पडेल ना.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, उत्तर द्या.

**सुर्यकांत भोईर :-**

जी कामं पास झालेली आहेत ती कामं प्रत्येक मागच्या अगोदरच्या बजेटमध्ये घेण्यात यावी.

**रतन पाटील :-**

बजेट झालेलं आहे. सगळं झालेल आहे. प्रत्येक डिपार्टमेन्टव्हाईस तो अहवाल द्यायला पाहिजे होता. तो अहवाल कोणी दिला नाही आणि बजेटच्या वेळेला सादर ही केला नाही की, एवढी बिल आहेत. असे काही झालेच नाही.

**मोहन पाटील :-**

सभापती महोदयांच्या परवानगीने बोलतोय, आपण मागच्या वेळेला कामं करताना बजेटमध्ये जी तरतुद केली होती. जे डी.पी. रस्ते वगैरे. जवळजवळ ४४-४५ कोटींची ती कामं होती. त्यात ज्याइतर स्वायत्ता संस्था आहेत किंवा बँकिंग तर आपण लोन काढण्यासाठी ते केल होते. जर ह्यावेळी काम काढायची असतील व कामं काढली तर लोनची प्रेसीजर पूर्ण झाली पाहिजे. लोनद्वारे त्यांना पैसे द्यायचे आहे. या बजेटमधून त्यांना आपल्याला पैसे द्यायचे नाही.

**सुर्यकांत भोईर :-**

हे जे छोटे-छोटे टेंडर निघालेले आहेत त्याची कामे चालू झालेली नाहीत. मग ती कामे आता चालू होणार आहेत ती ह्या बजेटमध्ये की मागच्या बजेटमध्ये? ह्या पैसामध्ये डी.पी. कामे केली तर ह्या बजेटमध्ये फरक पडेल ना.

**प्रेमनाथ पाटील :-**

मागच्या बजेटची कामे कुठे गेली?

**सुर्यकांत भोईर :-**

मागचा बजेट पास करुन मग फायदा झाला.

**दिपक खांबित :-**

ती बिल मार्च अखेरपर्यंत निघायला पाहिजे होती. पण ती बिल निघालेली नाहीत.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ते बरोबर आहे. पण ती तुमची कामे आहेत. तुम्ही ती कामं चालू करायला पाहिजे होती. ती रक्कम लॅप्स झाली म्हणजे पुन्हा आम्ही ए.बी.सी.डी. पासुन चालू करायचे का?

**प्रेमनाथ पाटील :-**

आपले पैसे होते म्हणून आपण ती कामं काढली की, नाही? मग ती कामं आपण उशीरा केली त्याचे पेमेन्ट झाले नाही तर ते पैसे आपल्याकडे बॅलेन्स पाहिजे ना.

**सुधीर नाकाडी :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, अर्थसंकल्पामध्ये जरी तुरतुद असली आणि बँक खात्यामध्ये पैसे असणे ह्या वेगळ्या गोष्टी आहेत. आपण जेव्हा एखादा प्रस्ताव मंजूर करतो. त्या अर्थसंकल्पाच्या तरतुदीनुसार तरतुद उपलब्ध आहे. म्हणून प्रस्ताव मंजूर करतो आणि जसेजसे तरतुदी मॅनेज करत जातो. पण त्याचवेळेला आपली जमा, बँकेमध्ये ॲक्च्युअल पैसा जमा होतो की नाही? किंवा टॅक्समधून, ऑक्ट्रॉयमधून जेवढी रक्कम जमा व्हायला पाहिजे तेवढी अपेक्षित रक्कम जमा होत नाही. त्यामुळे हा डीफरन्स होतो. त्यामुळे तरतुद आहे म्हणून आपण प्रस्ताव मंजूर करतो. कामं सुरु करतो. पण ३१ मार्चला सफीशिएंट अमाऊन्ट बँकेच्या खात्यामध्ये नसल्यामुळे सदरची बिल पेन्डीग पडतात. तो नविन वर्षाच्या बजेटमधून ती खर्ची पडणार आहे.

**मोहन पाटील :-**

साडेपाच कोटी रुपयाचे एफ.डी. आहे ना.

**शरद बेलवटे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय की, जनरल फंडातुन कोणत्याही प्रकारची एफ.डी. आलेली नाही. ३१ तारखेला जो वॉटर सप्लाय रिझर्व्ह फंड आहे त्याची ड्यु डेट संपलेली आहे तर त्याच्यात जास्तीत जास्त व्याजदाराने त्यातले व्याज फक्त जनरल फंडामध्ये जमा करुन मुद्दल पुन्हा रि-इनव्हेस्ट केलेली आहे. पण जनरल फंडातील कोणतीही इनव्हेस्टमेन्ट नाही. दरवर्षी बिल ही आऊट स्टॅन्डीग राहतात.

**मोहन पाटील :-**

बरोबर आहे साहेब. पण दहा कोटीची बिल राहतात हा विषय होऊ शकत नाही. दोन कोटीची बिल तीन कोटीची बिल ठेवून द्या. पण दहा कोटीचे जर बिल असेल तर बजेटमध्ये तफावत येईल.

**शरद बेलवटे :-**
प्रलंबत बिल ......
**रतन पाटील :-**
सादर केलेच नाही ना. बजेटच्यावेळी सादर केलीच नाही.
**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
आता किती बिल आहेत?
**शरद बेलवटे :-**
साडेतीन कोटी रुपयांची बिलं आहेत.
**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
दहा कोटीचे आहे ना.
**शरद बेलवटे :-**
नाही. साडेतीन कोटी रुपयांची आहेत.
**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
साडेतीन कोटी रुपयांची बिल प्रलंबित आहेत.
**सुर्यकांत भोईर :-**
आपण टेंडर कसे काढतात?
**सुधीर नाकाडी :-**
जमा रक्कमेवर आपण टेंडर काढत नाही. अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार करतो.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
स्थायी समितीच्या बजेटच्यावेळी श्री. बेलवटे साहेबांनी आपल्याला तीन वर्षाचा फरक दिला होता. तर ॲक्च्युअल जी प्रोव्हीजन आहे त्यात तुमच्याकडे जो फंड येतो, म्हणजे किती बजेटचे आहे ते त्यांनी दिले होते. त्याच्यावर आक्षेप झाला. जर आपण त्या ॲक्च्युअल बजेटचा विचार केला असता तर ही बिल पेन्डीग राहीली नसती.
**शरद बेलवटे :-**
जकात पोटी पाच कोटी येतील, शाळेपोटी पाच कोटी येतील. पण प्रत्यक्षात ते पैसे आलेच नाहीत.
**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
ते पैसे आल्याशिवाय प्रत्यक्षात ती कामं काढायची नाही.
**दिपक खांबित :-**
प्रशासनाच्या बजेटपेक्षा आपण पंचविस-तीस कोटी रुपये वाढवता.
**सुर्यकांत भोईर :-**
हे स्थायी समितीचे काम नाही. हे प्रशासनाचे काम आहे. वसुली करणे हे तुमचे काम आहे.
**दिपक खांबित :-**
प्रशासन जेव्हा बजेट देते त्याच्यामध्ये स्थायी समिती आणि मा. महासभा जवळजवळ ३० ते ३५ कोटी रुपयाची वाढ करते. मग ते पैसे जमा होत नाही.
**प्रेमनाथ पाटील :-**
व्हायला होतात.
**सुर्यकांत भोईर :-**
केल तर होत. नाही सांगितले तर काही होत नाही. केल्याने होते. तुमची इच्छाच नाही करायची तर?
**रतन पाटील :-**
वसुली व्यवस्थित केली तर आपले तेवढे उत्पन्नही वाढेल.
**कैलासबेन जानी :-**
अजून काही अशा बिल्डींग आहेत की त्यांना अजून टॅक्स लागलेला नाही.
**ध्रुवकिशोर पाटील :-**
आपली टॅक्स वसुली अजूनपर्यंत किती झालेली आहे? आम्ही वसुलीसाठी तुम्हाला सहकार्य करतो आणि तुमची टॅक्स वसुली होत नाही आणि जे टॅक्स वसुली करता त्यांना तुम्ही इन्क्रीमेन्ट देता. साहेब, ज्याप्रमाणे इन्क्रीमेन्ट देता त्याप्रमाणे तुम्ही त्यांना डि-इन्क्रीमेन्टपण द्या. त्यांना पनीशमेन्ट द्या.
**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**
इन्क्रीमेन्ट देत नाही. याठिकाणी दोन गोष्टीची गफलत होत आहे. जी कामे प्रस्तावित होतात. आपण जी मान्यता दिलेली आहे ती अर्थसंकल्पीय तरतुदीच्या आधारे प्रस्तावित होतात. प्रस्तावित झालेल्या कामामध्ये त्यावेळेस आपल्याकडे ॲक्चुअली मॉनेटरी बॅलेन्स असतेच असे नाही. जसजसे आपण कामे विकसित करतो आणि पेमेन्ट डिले होतात. तसे आपण फंडामध्ये तरतुद उपलब्ध राहून पेमेन्ट अदा केले जाते आणि जे मार्चच्या अखेरपर्यंत बिल आहेत ते पुढच्या वर्षी कॅरीफॉरवर्ड होतात. तशा प्रकारची आपण तरतुद केलेली आहे.

मागील जे खर्च न पडलेल्या ज्या बिलाच्या रक्कमा आहेत ते पुढे फॉरवर्ड होतात. आता ते पैसे तुम्ही का दिले नाही? असे त्यांचे डिसक्रीप्शन करतात ........

**रतन पाटील :-**

साहेब, तसा सवाल नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापती साहेब, पंधरा मिनिटाकरिता सभा तहकुब करा. आमची थोडक्यात अर्जंट सभा लागली आहे.

**मा. सभापती :-**

नाही.

**रतन पाटील :-**

अशी सभा तहकुब करता येणार नाही. तुम्हाला जायचे आहे तुम्ही जा. तुम्ही जाऊ शकता.

**मा. सभापती :-**

सभा तहकुब करता येणार नाही.

**रतन पाटील :-**

खतगावकर साहेब, ह्याच्यानंतर प्रत्येक तीन महिन्यांनी लेखा परिक्षण अहवाल स्थायी समितीपुढे आला पाहिजे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, आता आपण जो रस्ता बनवला, सिग्नलपासून ते साईबाबा मंदिर फाटकापर्यंत रस्ता बनवला. हा रस्ता टेम्पो स्टॅन्डसाठी बनवला आहे की, आपल्या रहदारीसाठी बनवला आहे.

**रतन पाटील :-**

जरासुध्दा जागा राहिलेली नाही. एक गाडीसुध्दा जाऊ शकत नाही.

**एस. ए. खान :-**

गाडी पास होत नाही आणि तिथे सगळे टेम्पो उभे असतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

आडवे टेम्पो लावतात.

**रतन पाटील :-**

साहेब, आज आम्हाला निर्णय पाहिजे आहे. मी मागच्या स्थायी समितीच्या सभेमध्ये बोललो होतो की टेम्पोंना समोरचा जो धर्मकाटा आहे तिथे इंड्रस्ट्रीमध्ये रोड आहे. तिथे स्टॅन्ड द्यावा. मेन रस्त्यावर कशाला?

**मा. सभापती :-**

धर्मकाट्याचा जो रस्ता गेलेला आहे. त्याच्यावर कुठली रहदारी नाही का?

**प्रेमनाथ पाटील :-**

नाही ना. तिथे पार्कींग करु शकतात.

**रतन पाटील :-**

आज निर्णय करावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आजच्या आज निर्णय द्यावा.

**मा. सभापती :-**

संबंधित अधिका-यांनी टेम्पो चालकांना तशी वॉर्निंग देऊन जो धर्मकाट्याचा पाठीमागचा रस्ता आहे तिथे कुठल्याही त-हेची ट्रॅफीक नसल्यामुळे त्या ठिकाणी तिथे टेम्पो उभे करण्यात यावे.

**रतन पाटील :-**

साहेब, त्याच्यामुळे रस्त्याचे काम थांबले आहे.

**एस. ए. खान :-**

त्या रस्त्याचे काम ह्याच्याकरिता उशीरा झाले आहे. लवकर काम झाले नाही.

**रतन पाटील :-**

प्रशासन का करुन घेत नाही?

**प्रभात पाटील :-**

सभापती साहेब, या रस्त्यावरुन तुम्ही जात नाही? तर जातात. उपमहापौर जात नाही? जातात. महापौर जात नाही? जातात. अधिकारी वर्ग त्या रस्त्यावरुन येत नाही? हे फक्त स्थायी समितीच्या सदस्यांनी का एवढा ओरडा करायचा का?

**मा. सभापती :-**

आपल्या माहितीसाठी सांगतो. संबंधित अधिका-याला सांगितले आहे. परवाच्या दिवशी शेख साहेबांना सांगितले आहे.

**प्रभात पाटील :-**

कोणालाच दिसत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

येथे यायचे बडबड करायचे आणि निघून जायचे का?

**मा. सभापती :-**

मी स्वतः त्यांना फोन करुन, मी स्वतः बी.पी. रोडला, नवघर रोडला गाड्या उचलायला लावल्या. मी स्वतः मागे माझी गाडी फिरवत होतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

मेन रोडवर टेम्पोवाले टेम्पो आडवे तिडवे लावतात. त्यामुळे जायला रस्ता नाही.

**रतन पाटील :-**

आपला एवढा मोठा छत्रपती महाराज मार्ग चांगला बनवला आणि येथे ही परिस्थिती. भंगारवाल्यांच्या सगळ्या गाड्या आणि तो रस्ता भंगार होत चालला आहे. हे काय चालले आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आणि एकीकडे गॅरेजवाल्यांच्या गाड्या.

**मा. सभापती :-**

जे गाड्या उचलायला जातात त्यांना कडक वॉर्निंग देऊन टाका. नाहीतर सर्वांना सस्पेंड करुन टाका. हे काय चालले आहे? रोज ऐकायला लागते.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण कडक धोरण घ्या.

**एस. ए. खान :-**

मिरा रोडला मच्छी मार्केटच्या कोपऱ्याला जसे येथे टेम्पोवाल्यांची दादागीरी आहे तसे तेथे एक सरबतवाला आहे त्याची एवढी दादागीरी आहे की तो तेथून हटत नाही. तो तिथे मेन रोडला आहे. मेन रोडला दोन हातगाडीवाले आहेत. एवढे बसतात की, ते आपल्या टी.एम.टी.च्या बसला आणि आपल्या कॉर्पोरेशनच्या बसला कमी तोंड द्यावे लागते. एवढी दादागीरी. शेख साहेबांना कितीवेळा सांगितले की, तेथून ती गाडी उचला तरी ती गाडी उचलत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

गुरुवारी, साडेसात वाजता टेम्पो नंबर देतो ........

**एस. ए. खान :-**

त्या गाडीवाल्यांची एवढी दादागीरी. शंभर फुटाच्या कोपऱ्यावर.

**रतन पाटील :-**

दादागीरी आहे. हे तसेच चालले आहे ना. ऐकत नाही. आपल्या महापालिकेचे अतिक्रमण पथक गेल्यानंतर परत ते बसतात.

**मा. सभापती :-**

गुरुकृपा हॉस्पीटलजवळ, कोपऱ्यावर एक सरबतची गाडी लागलेली आहे. नेहमीची आहे. एक दिवशी मी माझ्या भावाला इलेक्ट्रीक शॉक लागला तेव्हा मी त्याची गाडी उलटी करुन गेलो होतो.

**एस. ए. खान :-**

ट्राफीकला भरपूर अडथळा निर्माण करतात. तिथे नो पार्कींगचा बोर्ड लावला आहे तो देखील काढून टाकला. मेन रोडला कोपऱ्यावर आहे. त्या दोन गाड्या आहेत त्या तेथून हटतच नाही आणि फेरिवाले उचलण्याचे बंद झाले का?

**रतन पाटील :-**

आपण ह्याच्यावर काहीतरी कडक निर्णय घ्या.

**गजानन भोईर :-**

सदस्य म्हणून त्यांच्यावर काय कोणी ॲक्शन घेतो?

**एस. ए. खान :-**

उपायुक्त साहेब आपण सांगा की, फेरिवाल्यांना उचलणे बंद झाले का? ह्याचे मला उत्तर द्या?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अतिक्रमण/अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने हा विषय मा. आयुक्त साहेबांनी स्वतःकडे घेतलेला आहे. त्यासाठी विभागीय क्षेत्र अधिकारी आणि क्षेत्रिय प्रमुख ह्यांच्या नियुक्त्या दिलेल्या आहेत. याठिकाणी जे चर्चेला आलेले आहे की वजन काट्याच्या मागे जे टेम्पो उभे करतात ते धर्माच्या काट्याच्या ........

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, तो रस्ता ओपन आहे. धरमकाट्याचा जो रस्ता आहे तो रस्ता ओपन आहे. त्याठिकाणी टेम्पो स्टॅन्ड हलवावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याठिकाणी टेम्पो स्टॅन्ड शिफ्ट करण्यासाठी सन्मा. सदस्यांच्या ज्या सुचना आहेत त्या सुचना संबंधित खात्याला देऊ आणि शहरामध्ये ना फेरिवाला जागी गाड्या लावलेल्या आहेत. जसे मिरारोडच्या ठिकाणी त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आम्ही या सुचना निर्गमित करु.

**मा. सभापती :-**

गोल्डन नेस्टवरुन जो रस्ता गेलेला आहे, हनुमान मंदिराच्या येथून तो रस्ता त्याने मधे बंद केलेला आहे. तो रस्ता ताबडतोब खुला करावा.

**गजानन भोईर :-**

त्याने पुढे बंद केलेला आहे. तुम्ही तुमचे पॉवर वापरा आणि आदेश द्या. आत्ताच्या आता तो रस्ता खुला करण्यात यावा.

**मा. सभापती :-**

तोडायला लावले नाही तर, एकदा तोडले देखील आहे.

**एस. ए. खान :-**

अध्यक्ष साहेब, त्या चायनीजवाल्यालाही गाडी उचलायला सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, आपल्याकडून गुरुवारी साडे पाच ते पावणे सहा वाजता एक टेम्पो निघाला होता. टेम्पो नंबर आहे एम.एच.०४ ए.जी. ३७४४ हा टेम्पो गाड्या उचलण्यासाठी गेला होता का बोर्ड उचलण्यासाठी गेला होता ह्याचा मला खुलासा द्यावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एवढी इन्डीव्ह्युजव्हल कार्यवाही ह्या सभागृहापुढे .......

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, त्या स्पॉटवर एक ज्युसवाला जवळ उभा होता. गाडीवाले आले दोन तीन संत्रे घेतली. त्याला सांगितले गाडी अंदर लो आणि ते सरळ पुढे गेले. म्हणून त्याचा मी हा गाडी नंबर लिहून घेतला.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, आपण आठवड्याचे सोमवारपासून शनिवारपर्यंत कार्यवाही करतो. माझी अशी विनंती आहे की, आपण रविवारीसुध्दा अतिक्रमण पथक ठेवा. कारण रविवार हा महत्वाचा दिवस आहे आणि रविवारी बी.पी. रोड व नवघर रोडवर पाय ठेवायला, चालायला जागा मिळत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

रतन पाटील साहेब, आपल्याकडे वीस माणसे ठेवली आहेत ना. किती वेळा कार्यवाही केली ते विचारा. ती वीस माणसे कशासाठी ठेवली आहेत?

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेब, सदर प्रकरणाबाबत कडक कारवाई करावी.

**रतन पाटील :-**

साहेब, मुख्य रस्ते मोकळे करुन घ्या.

**एस. ए. खान :-**

चायनीजच्या गाड्याचेही सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

रविवारी अतिक्रमण पथक काढण्याचे नोंद घेऊ.

**मा. सभापती :-**

उपायुक्त साहेब, आपण आयुक्त साहेबांना सांगा की, आपण तुमच्याकडे हा विषय घेतला आहे. आयुक्त हे मेन स्वीच आहेत. जर मेन स्वीच नीट चालत नसेल तर मग नाईलाजाने आम्हाला एक पत्रकार परिषद बोलावून आयुक्तांकडे खाते असल्यामुळे हे वाढवायला घेतले आहे.

**प्रभात पाटील :-**

नवघर रोड आणि बी.पी. रोड क्लीअर करा.

**मा. सभापती (मोहन पाटील) :-**

तसेच, जिथे गाई बांधल्या आहेत तर तो गाईवाला कोण आहे? त्याला आज संध्याकाळी फटकावयाला लावतो.

**रतन पाटील :-**

साहेब, आपले हे पथक कार्यवाही करतात. त्यांचे मोर्चे येतात. त्यांच्या पथकाला किंवा त्यांच्या मोर्च्याला भीक घालू नका. आम्ही आहोत.

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र.०१ चे वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब, कॅन्टीनचे काय झाले?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कॅन्टीनचे टेन्डर काढले आहे.

**गजानन भोईर :-**

टेन्डर कधी काढले? कुठल्या पेपरला आहे?

**प्रभात पाटील :-**

पेपरचे नाव सांगा.

**प्रेमनाथ पाटील :-**

निविदा कोणत्या पेपरला दिलेले आहे?

**रतन पाटील :-**

फॉर्म भरण्याची २० तारीख लास्ट आहे.

**गजानन भोईर :-**

आपण अशा पेपरला निविदा देता की, ते कोणाला माहितच नसते.

**प्रभात पाटील :-**

चर्मकार लोकांना आपण जे स्टॉल दिलेले आहेत. तर ज्यांना आपण परवानग्या दिल्या आहेत तेवढेच लोक या शहरात बसतात का? ह्याचा एक पाहणी अहवाल तयार करावा. आपल्याकडून वीस परवानग्या दिल्या असतील तर ह्या शहरामध्ये चर्मकार किती आहेत?

**रतन पाटील :-**

आणि ते कुठून कुठून आले आहेत ते बघा.

**एस. ए. खान :-**

उपायुक्त साहेबांना सांगू इच्छितो की, सगळे बाहेरचे लोक आहेत. ८० टक्के लोक बाहेरचे आहेत.

**रतन पाटील :-**

एका नावावर पाच-पाच परवानग्या दिलेल्या आहेत.

**एस. ए. खान :-**

८० टक्के लोक बाहेरचे आलेले आहेत.

**प्रभात पाटील :-**

ते बाहेरचे असो किंवा कुठचेही असो.

**जयंत पाटील :-**

आगरी समाजाचे ते चर्मकार नाही. पण एकाला किती स्टॉल द्यायचे? हा विचार करा.

**प्रभात पाटील :-**

एका माणसाच्या नावावर किती स्टॉल आहेत?

**रतन पाटील :-**

या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये अपंग जर आपल्याकडे बुथ मागतो तर त्याच्यासाठी त्याला वर्ष, दोन वर्ष त्याला रखडवतात.

**प्रेमनाथ पाटील :-**

दोन ते अडीच हजार रुपये एक स्टॉल भाड्याने ते देतात.

**एस. ए. खान :-**

आमच्या यथे एक माणूस आहे त्याने सगळे लावले आहे.

**रतन पाटील :-**

हा फार मोठा रॅकेट आहे. तेलगी घोटाळ्यापेक्षा हा सगळ्यात मोठा घोटाळा आहे.

**जयंत पाटील :-**

उपायुक्त साहेब, आपण ज्या गोष्टीसाठी त्यांना स्टॉल देतो ती गोष्ट तिथे नसतेच. दुसरा वेगळाच बिझनेस आतमध्ये चालतो. माझ्या यथे त्या स्टॉलमध्ये कपडे विकायला लागले आहेत.

**प्रभात पाटील :-**

आपण ते स्टॉल त्यांना शिवणकाम किंवा मोची काम करण्यासाठी त्यांना आपण ते स्टॉल दिलेले आहे ती लोक रेडीमेंट चप्पलांचे दुकान घालतात. त्यांचे तिथे भलतेच काम चालते.

**प्रेमनाथ पाटील :-**

काही ठिकाणी पक्के स्टॉल बनवले आहेत.

**रतन पाटील :-**

कुठे? मुख्य रस्त्यावर, फुटपाथवर.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपल्या पालिकेला ते टॅक्स देतात ना.

**रतन पाटील :-**

किती जणांना आपण परवानगी देतोय. त्यांनी धंदा करावा मान्यता आहे.

**प्रभात पाटील :-**

माझी एक रिक्वेस्ट आहे की, माझ्या विभागात शंकर मंदिर आहे. मंदिर हे पवित्र मानले जाते. त्या मंदिराच्या बरोबर दारासमोर त्या चर्मकार स्टॉलमुळे ते मंदिरसुध्दा दिसत नाही. ते स्टॉल तेथुन काढा आणि दुसरीकडे घ्या. एवढीसुध्दा पालिका एका मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी सहकार्य करत नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्टॉल नविन आहे की जुने आहे?

**प्रेमनाथ पाटील :-**

सर्व स्टॉल नविन आहे.

**प्रभात पाटील :-**

तो स्टॉल जुनाच आहे. परंतु, मंदिर आहे. त्या मंदिराच्या बरोबर समोर. जरा आपण सहकार्य करा. तिथल्या नगरसेवकांना सहकार्य करु नका. पण कमीतकमी त्या बिल्डींगवाल्यांना, त्या मंदिरवाल्यांना तरी सहकार्य करा. आपल्याकडे देवाला चामडे वर्ज आहे. चामडे आपण वापरत नाही आणि तो नेमका समोर बसला आहे.

**कैलासबेन जानी :-**

साहेब, साठ फुटीवर गणेश मंदिराच्या येथीलही सांगा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

संबंधित विभागाला आतापर्यंत आपण किती स्टॉलला परवानगी दिलेल्या आहेत आणि संबंधित तेच काम करतात का? तोच व्यवसाय करतात का? ह्याचा सर्व्हे करुन अहवाल सादर करण्याकरिता सुचना करतो.

**रतन पाटील :-**

तो स्टॉल कोणाच्या नावावर आहे? ह्याची ही माहिती घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

ज्या व्यक्तीच्या नावावर आहे तिथे बसवे.

**जयंत पाटील :-**

त्यांनी काय केले, त्यांनी आपल्या नावावर, आपल्या मुलीच्या नावावर असे ही आहे. म्हणजे घरातल्या प्रत्येक व्यक्तीच्या नावावर घेतलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

एका स्टॉलचे आणखीन उदाहरण सांगते. सन्मा. सदस्य जयंत पाटील ह्यांना त्याची कल्पना असेल. नवघरच्या ग्राऊंड समोर जे चमड्याचे दुकान आहे. तो साहेब मैदानाच्या पाच फुट आतमध्ये शिरला आहे. त्याने आपले मैदान पाच फुटाचे कव्हर केलेले आहे.

**गजानन भोईर :-**

ती लाईन कुठली आहे? त्या संपूर्ण लाईनला परमिशन दिलेले आहे का?

**प्रभात पाटील :-**

त्या लाईनमध्ये सतराशे साठ टपऱ्या आहेत. त्याच्याशी मला काय करायचे नाही. त्याने पक्के बांधकाम केले आहे ते विचारा आणि मैदानाच्या पाच फुट आतमध्ये शिरला आहे.

**रतन पाटील :-**

नवघर शाळेच्या आतमध्ये ना.

**प्रभात पाटील :-**

होय.

**रतन पाटील :-**

ते तिथे कशाला दिलेले आहे? तिथे अगोदर झुणका भाकर केंद्र होते. ते आता केवढे झालेले आहे. दि. १३/०१/२००६ च्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. २९ वर आयुक्त साहेबांनी दिलेल्या आदेशाची कार्यवाही झाली काय?

**गजानन भोईर :-**

पाईप लाईनचे, गटारावर स्लॅब टाकण्याचे सांगितलेले होते. त्या गटाराचे मी आपल्याला लेटर दिलेले होते. ह्याच्यात मी बोललेलो ही आहे. ती पाईप लाईन अजूनपर्यंत शिफ्टींग केले नाही. गोडदेव नाक्यापासून ते गावदेवी मंदिरापर्यंत गटार जाते.

**शिवाजी बारकुंड :-**

तिथे गटाराचे काम झाले ना.

**गजानन भोईर :-**

नाक्यापासून झाले आहे तेवढे तरी करुन घ्या.

**प्रेमनाथ पाटील :-**

पान क्र. २५ वर सर्व रोडचे ॲडजेस्टमेन्ट आहे. तिथे ॲग्जेस्टस्टॅन्ड पाहिजे.

**रतन पाटील :-**

खतगावकर साहेब, पान क्र.२९ वर आयुक्त साहेबांनी जे निर्देश दिलेले आहेत त्याप्रमाणे कार्यवाही केली आहे का?

**एस. ए. खान :-**

पान क्र. ३४ वर प्रभाग ११ आणि ४ नाही. प्रभाग १४ आणि १५ आहे आणि पान क्र. ३५ मध्ये १५ आणि १४ आणि प्रभाग क्र. ०४.

**गजानन भोईर :-**

दि. २५/०१/२००६ च्या इतिवृत्तांतामध्ये पान क्र. ०४ वर भाईंदरवासियांना होळीचा महिना अतिशय खराब असतो. तर असे लिहिले आहे की, होळीचा महिना दोन वर्षापासून अतिशय खराब जातो.

(सन्मा. सदस्य प्रेमनाथ पाटील यांनी प्रकरण क्र. ०१चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**एस्. ए. खान :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. ०१ :-**

दि. १३/०१/२००६ व दि. २५/०१/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ०१ :-**

दि. १३/०१/२००६ व दि. २५/०१/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सचिवांनी प्रकरण क्र. ०२ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

साहेब पान क्र.३ वर बघा, तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषदेतील ०२/०९/१९८५ ते २७/०२/२००२ या कालावधीचे विशेष लेखापरिक्षण, मुख्य लेखापरिक्षण आणि हा अहवाल कधी द्यायचा होता. सदरचे अहवाल अनुपालन लवकरात लवकर मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर न केल्यास शासन स्तरावर कारवाई होऊ शकते. त्यामुळे याबाबत तत्काळ निर्णय होणे आवश्यक आहे. हे आहे. ०२/०९/१९८५ ते २७/०२/२००२ या कालावधीत हा अहवाल आला नाही किंवा सादर केला नाही का? आपण शासनाला काय दिले? शासनाकडे ह्याची कारवाई केली नाही का? शासनाला आपण हा रिपोर्ट पाठवला नाही. साहेब, हा एवढा कालावधी आहे. तर आपण शासनाकडे कधीच जायला पाहिजे होते.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यामध्ये चक्क उल्लेख केला आहे ना. महाराष्ट्र राज्य ह्यांना पाठविणे आवश्यक होते. परंतु, दोन ते अडीच वर्षे होऊनही हा अहवाल सादर करण्यात आलेला नाही. कारण काय?

**रतन पाटील :-**

इतका उशीर का झाला? ह्याची पुर्तता व्हायला पाहिजे होती तर एवढा उशीर का झाला?

**प्रेमनाथ पाटील :-**

अडीच वर्ष उशीर का झाला ह्याचे उत्तर येऊ द्या ना.

**सुधीर नाकाडी :-**

अडीच वर्ष का उशीर झाला तर तत्कालीन जे लेखापाल होते श्री. विजय पाटील यांनी अजून त्याची पुर्तता केली नाही आणि पुर्तता केल्याशिवाय तसा अहवाल शासनाला सादर करता येत नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

याबाबत विजय पाटील ह्यांना उत्तर देऊ द्या. आपण का उत्तर देता?

**रतन पाटील :-**

ह्याचे उत्तर कोण देणार?

**प्रेमनाथ पाटील :-**

हे सन १९८५ ते २००२ पर्यत ते होते. तर त्यांना उत्तर देऊ द्या ना.

**जयंत पाटील :-**

मला वाटते ह्या विषयासाठी आपण स्पेशल सभा लावायला पाहिजे. कारण हा विषय मोठा आहे.

**सुधीर नाकाडी :-**

सन ०४-०५ चा ॲन्युअल म्हणजे अंतर्गत लेखा परिक्षकांनी केलेला रिपोर्ट म्हणजे ह्याच्यामध्ये ज्या काही त्रुटी राहिल्या आहेत त्याच्यासाठी आणि ह्यांनी जो विषय काढलेला आहे तो विषय आपल्याकडे पेन्डीग आहे आणि हे फक्त स्थायी समितीच्या माहितीसाठी आलेले आहे. तो काही मंजूरीसाठी किंवा चर्चेसाठी आलेला नाही. आणि त्याला ए.जी.चा आक्षेप आहे. तो ए.जी.चा अहवाल माहितीसाठी आला आहे आणि जे प्रकरण क्र. ०५ जे आहे तो ए.जी.चा अहवाल आहे. तो स्थायी समितीसमोर सादर केला असे ए.जी.ने कळवा म्हटले आहे. त्यासाठी तो विषय आलेला आहे. त्यामुळे हा विषय चर्चेला आलेला नाही.

**जयंत पाटील :-**

आपले म्हणणे बरोबर आहे. मी पाचवा विषय वाचला आहे. पाचव्या विषयामध्ये भरपूर क्वेरिज काढल्या आहेत. त्याच्यात भरपूर चुका दाखवल्या आहेत. त्याच्यावर चर्चा तर करावीच लागणार.

**सुधीर नाकाडी :-**

त्याचे कम्पलईन्ससुध्दा पाठविले आहे. बऱ्याच विभागाने त्याचे कम्पलाईन्स .......

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, पान क्र.४ वर त्यांनी चक्क उल्लेख केलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

आपल्याला विनंती आहे की, सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या सदस्यांनी मागचे कागदपत्र घेऊन आलेच नाही. मी आणले नाही. न आणणारे सदस्य भरपूर आहेत.

**गजानन भोईर :-**

स्पेशल विषय घ्या.

**सुर्यकांत भोईर :-**

सचिव साहेब, ह्या विषयावर आपण स्पेशल सभा लावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

पान क्र.४ मध्ये चक्क उल्लेख केलेला आहे की, तशी त्याची पुढील कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हे कम्पलाईन्स आहे मान्य आहे. मा. आयुक्त साहेबांकडून निश्चित केला जातो आणि त्याची जी कामकाजाची पध्दत आहे. त्यावर ए.जी.ने काय आक्षेप काढलेले आहे. महालेखाचा तपासणीत किंवा लेखाच्या तपासणीत काय आक्षेप निघालेले आहेत ह्याची कल्पना आपल्याला व्हायला पाहिजे. काय कम्पलाईन्स होतो? ह्याचीसुध्दा आपल्याला कल्पना व्हावी लागते. ह्याच्यासाठी हा अहवाल आपल्या समोर ठेवलेला आहे. आपण चर्चा करुन आम्हाला, आयुक्तांना निर्देश देऊ शकतात आणि त्याप्रमाणे त्याची कार्यवाही आपण करु.

**जयंत पाटील :-**

म्हणजे स्थायी समितीने आपल्याला निर्देश द्यायचे आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

निर्देश देणे किंवा ऑब्जर्व्ह करणे.

**जयंत पाटील :-**

नुसते ऑब्जर्व्ह करायचे मग विषय आजपण आणण्याची काय गरज होती?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण ऑब्जर्व्ह केले व निर्देश दिले नाहीत तरी त्याची अंमलबजावणी मा. आयुक्त साहेबांच्यावतीने केली जाते.

**प्रभात पाटील :-**

हे करणार आणि आम्ही काही निर्देश दिले तर ते ग्राह्य धरणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ॲड करुन मान्य केले जातील.

**प्रभात पाटील :-**

ॲड करणार. म्हणजे ह्याचा अर्थ जर आम्ही त्याच्यामध्ये महत्वाचा विषय ठरवत असू तर आम्हाला निश्चितपणे त्याच्यामध्ये बोलता आले पाहिजे, चर्चा करता आली पाहिजे.

**रतन पाटील :-**

आपण बोललात ते बरोबर आहे की, आक्षेपाची पुर्तता व्हायला पाहिजे आणि ती पुर्तता करुन .......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण दिलेल्या प्रशासकीय मंजुरीच्या अधीन, मा. महासभेच्या प्रशासकीय मंजुरीच्या अधीन, आपण सुचवलेल्या कामकाजाच्या अधीन निकडीच्या परिस्थितीत जी कामे उद्‌भवतात व जो काही आपला वार्षिक कामकाज होतो तो कायदे प्रणालीत कामकाज झाले की नाही ह्याच्यासाठी काऊन्टर चेक करण्यासाठी अशा तरतुदी आहेत आणि त्यांनी आपला अभिलेख तपासल्यानंतर ज्या फायडिंग काढतात त्या फायडिंगचे

कम्पलाईन्स प्रशासनाकडून होत असते पण त्या फायडिंग स्थायी समितीच्या समोर सादर करणे हे कायद्यात तरतुद आहे. त्याप्रमाणे हा अहवाल आपल्या समोर सादर केलेला आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, बरोबर आहे. आपण येथे अहवाल सादर केलेला आहे पण त्याला अवधी किती आहे? जे आक्षेप त्यांनी आता दिलेले आहे त्याची पुर्तता व्हायला पहिजे. हे सन १९८५ पासुनचे आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील साहेब, ३१ मार्चला पत्र आलेले आहे आणि आता एप्रिल महिना आहे.

**सुधीर नाकाडी :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, आपण जे म्हणालात की ए.जी.चे जे आक्षेप आहेत ना ते आता हा टेस्ट रिपोर्ट आहे त्याच्यामधल्या सगळ्या विभागाने ए.जी.कडे कम्पलाईन्स पाठवलेले आहे. त्यातले बांधकामाचे दोन आणि ऑक्ट्रॉयचा एक कम्पलाईन्स मान्यतेसाठी आलेले आहे. म्हणजे त्या तारखा वगळल्या आहेत. अशा प्रकारे जे सगळे कम्पलाईन्स आहेत ते प्रलंबित आहे. त्यांच्याकडून त्यांनी वगळले तर ठिक आहे, नाही वगळले तर त्याच्यावर आता आपण ऑक्ट्रॉय वगैरे वसुल केलेले आहेत. ज्या दंडाच्या रक्कमा आहेत त्या वसुल करुन तसे चलन भरुन चलनाची एक झेरॉक्स त्यांना दिलेली आहे आणि त्यांनी असे आक्षेप मान्य केले आहेत की, ठिक आहे. त्याच्यावर कार्यवाही पूर्ण झालेली आहे आणि तो आक्षेप वगळला. अशा पध्दतीने तीन आक्षेप वगळले आणि बाकीचे जे आक्षेप आहेत ते त्यांच्या स्तरावर ते निघेल.

**जयंत पाटील :-**

विषय नं. ५ मध्ये, विषय नं. ५ आणि हा विषय जवळ जवळ सारखाच आहे, बरोबर. विषय नं. ५ मध्ये त्यांनी अनेक क्वेरिज काढलेल्या आहेत की आपल्याला त्या सुचनांचे पालन करावे लागेल. आता मघाशी मागच्या बजेटचे दहा करोड येथे खर्च करणार आहोत. ह्याच्यात त्यांनी दाखवले आहे, पान क्र. ६ वर दाखवले आहे की, आपण बजेट बनवले आहे. ९८ करोड ते २००३-०४ चे. टेक्नीकल इन्स्पेक्शन रिपोर्ट आहे. त्याच्यात २००३-०४ चे बजेट प्रोव्हीजन आपण दिलेले आहे. ९८ करोड ९४ लाख रुपये. ॲक्च्युअल आपली वसुली झाली ८७ करोड रुपये. म्हणजे आपला डिफरन्स ११ करोड रुपयाचा आलेला आहे. हा जो फरक पडतोय, जे तुम्ही मघाशी म्हणालात, म्हणजे बजेटमध्ये आपण फक्त प्रोव्हीजन करतो. पण ॲक्च्युअल तेवढी वसुली होत नाही. त्याच्यामुळे मागची कामे भरपूर काढतो आणि मग ह्या बजेटमधली अमाऊन्ट त्या बजेटमध्ये करतो. सन २००३-०४ मध्ये तुम्हाला ४२ करोड ३९ लाखाचे डिफरन्स पडले ही थोडी थोडकी अमाऊन्ट नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

एक्झेस्टींग एक्स्पेंडीचर आणि रिसिव्हर्ड ह्याच्यामध्ये पहिल्यामध्ये १५ करोडचे फरक आहे.

**जयंत पाटील :-**

मग आपण बजेट प्रोव्हीजनवर काम का काढता?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या वर्षी प्रशासकीय मंजुरी देऊन ती अमाऊन्ट आपल्याला रि-चेक करुन घ्यायला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

हा फरक एवढा पडत जाईल. मग हे संपूर्ण बजेटवर प्रत्येक वर्षी फरक पडत जाईल.

**रतन पाटील :-**

साहेब, सन २००२ पासून ते आजपर्यंत दिडशे कोटीचा फरक आहे. प्रत्येक वर्षी तसेच.

**गजानन भोईर :-**

हा विषय पुढच्यावेळी सेपरेट घेण्यात यावा.

**प्रेमनाथ पाटील :-**

पुढच्यावेळी म्हणजे कधी? आठ दिवसात, पंधरा दिवसात, महिन्याने कधी?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कॅन्टीनची २० तारीख लास्ट डेट आहे आणि दै. सागरमध्ये जाहिरात दिली आहे.

**प्रभात पाटील :-**

साहेब, ह्याचे तुम्ही काय ठरविले आहे की, कुठच्या पेपरला आपण जाहिरात द्यायचे किंवा काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याचे रोटेशन आहे. सामान्य प्रशासनाकडे ह्याची यादी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

उपायुक्त साहेब, मला वाटते हा पेपर भाईंदर पुरताच आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

नाही. विभागीय लेव्हलचे दैनिक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण नवशक्ती पेपरमध्ये द्या. नवशक्ती ऑल महाराष्ट्रामध्ये वाचले जाते.

**प्रभात पाटील :-**

जनरली लोक जे पेपर वाचतात त्या पेपरमध्ये जाहिरात का देत नाही?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याच्यामध्ये रोटेशन आहे.

**प्रभात पाटील :-**

आपण कसले रोटेशन घेऊन बसलात.

**ज्युडी डिसोझा :-**

जे साधे पेपर आहे त्याच्यामध्ये तुम्ही देता.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आम्ही नवशक्ती पेपर घेतो. हे पेपर आम्ही घेत नाही.

**ग्रिटा फॅरो :-**

आम्ही ही नवशक्ती पेपर घेतो.

**प्रभात पाटील :-**

आपण एक काम करा. तुमचे जे रोटेशन आहे ना त्याचा सगळा इश्यु करुन द्या. सगळ्याच्या सगळ्या नगरसेवकांना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कॅन्टीनबाबत प्रशासनाकडून कोणत्याही पध्दतीचे गुपीत नाही. सर्व काम ओपनली आहे. ह्याची जी २० तारीख आहे.

**प्रभात पाटील :-**

ते कोणाला माहिती?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

टेन्डर घेण्याची आणि सबमिट करण्याची २० तारीख आहे.

**ग्रिटा फॅरो :-**

साहेब तो कुठला पेपर आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही जाहिरात दै. सागर या पेपरमध्ये आलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

कोणत्या तारखेचा तो पेपर आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

६ एप्रिलचा पेपर आहे.

**प्रभात पाटील :-**

आणि आज किती तारीख आहे, १७ तारीख. म्हणजे ११ दिवस झाले तरी एकाही सदस्याला या गोष्टीची कल्पना नाही. फक्त इथे ह्या सदस्यांनी घसे फोडायचे का? तेही महापालिकेच्या फायद्यासाठी.

**गजानन भोईर :-**

मिरा भाईंदरवाले नवशक्ती पेपर, सकाळ पेपर वाचतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

गजानन भोईर साहेब, मी हिंदुस्तान टाईम्स वाचतो म्हणजे काय हिंदुस्तान टाईम्समध्ये जाहिरात द्यायला पाहिजे का?

**रतन पाटील :-**

आम्ही सामना पेपर वाचतो.

**गजानन भोईर :-**

आमचा जागेचा विषय आहे आणि हे नवशक्ती पेपर वाचतात.

**ग्रिटा फॅरो :-**

नवशक्ती पेपर वाचतो.

**गजानन भोईर :-**

नवशक्ती पेपर हा प्रत्येकाच्या घरात असतो.

**प्रभात पाटील :-**

आजची १७ तारीख आहे आणि एखाद्या माणसाला जर टेन्डर घ्यायचे असेल तर तो काय तयारी करेल?

**ज्युडी डिसोझा :-**

दोन दिवसात काय करेल.

**प्रभात पाटील :-**

आपण एक्स्टेंशन द्या. कोणाला माहिती नाही म्हणून मी तुमच्याकडे स्पष्ट आरोप करते की, तुम्ही काही जाहिराती अशा काढता की तुमच्या समोर एक इन्टेशन असते की, ह्या माणसाला ते काम द्यायचे किंवा ह्या माणसाला सिलेक्ट करायचे.

**ज्युडी डिसोझा :-**

आणि जाहिरात द्यायची म्हणून द्यायची.

**प्रभात पाटील :-**

हा तुमचा सरळ उद्देश असतो. फक्त तुमच्यावर कोणी बोट ठेवायला जागा ठेवू नये म्हणून तुम्ही ह्या अशा फालतु पेपरमध्ये, कोणी न वाचणाऱ्या पेपरमध्ये जाहिराती देता. तुमचा स्पष्ट उद्देश असतो की, काय करायचे आहे? हे धोरण तुम्ही ठरवलेले असते. मी स्पष्ट आरोप करते आणि ओपन आरोप करते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

प्रशासन हा आरोप मान्य करत नाही. दै. सागर हा पेपर काही छोटा पेपर नाही हे मी तुमच्या माहितीस्तव सांगतो.

**प्रभात पाटील :-**

फक्त मी सगळ्यांसमोर ओपन बोलते म्हणून मी वाईट असते. पण मला सगळ्या काही गोष्टी समजतात.

**ज्युडी डिसोझा :-**

आपण या तारखेमध्ये एक्स्टेंशन द्या.

**प्रभात पाटील :-**

कोणाला माहित नाही म्हणून आपण या तारखेमध्ये एक्स्टेंशन द्या.

**एस. ए. खान :-**

आपण येथे फुड इन्स्पेक्टरची इंटरव्ह्यु झाली हे कोणाला माहिती आहे का?

**रतन पाटील :-**

२० तारखेपर्यंत आहे.

**प्रभात पाटील :-**

दोन दिवसामध्ये तुम्ही कोणते लेटर गोळा करणार?

**एस. ए. खान :-**

फुड इन्स्पेक्टरची परवा दिवशी इन्टरव्ह्यू झाली. खतगावकर साहेब आणि शेख साहेबांनी इन्टरव्ह्यू घेतली.

**रतन पाटील :-**

सर्वांना सांगायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

ही निविदा आली तरी मंजूर करु नका. मंजुरीला आल्यावरही आम्ही ह्याला मंजुरी देणार नाही.

**एस. ए. खान :-**

फुड इन्स्पेक्टरची मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये वेकन्सी आहे ह्याच्याबद्दल कोणाला माहिती आहे का? परवाच्या दिवशी इंटरव्ह्यू घेण्यात आला.

**रतन पाटील :-**

विषय आला होता ना.

**एस. ए. खान :-**

फुड इन्स्पेक्टरचा कुठे विषय आला? हे कोणाला माहिती आहे का?

**गजानन भोईर :-**

खतगावकर साहेब, ही गोष्ट खरी आहे का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे. इन्टरव्ह्यू घेण्यात आलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

कौन आदमी सिलेक्ट करनेवाले है? उसका नाम भी मालुम है।

**प्रभात पाटील :-**

मी तेच बोलतेय. हे सगळं ठरलेले असते, दृष्टीकोन ठरलेला असतो आणि म्हणून त्याच्यामध्ये आणखी काय होऊ नये म्हणून असा एखाद्या कोपऱ्यात टाकतात ती जाहिरात की, त्याच्यामध्ये कोणाला हस्तक्षेप करता येऊ नये.

**सुर्यकांत भोईर :-**

त्यांना ज्याला टेंडर द्यायचे आहे, त्यालाच टेंडर देण्याची इच्छा आहे.

**विजय पाटील :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, टेन्डरची नोटीस प्रसिध्दी दिलेली आहे. उपहारगृहाची ठेका प्रसिध्दीची ती जी नोटीस दिलेली आहे. ही रोटेशन पध्दतीने दिलेली आहे आणि ही जी नोटीस दिलेली आहे ती तिसऱ्या मजल्यावरुन सामान्य प्रशासन विभाग आहे त्यांच्याकडून दिलेली आहे. रोटेशन पध्दतीने........

**प्रेमनाथ पाटील :-**

विषय तुमचा आणि तिसऱ्या मजल्यावरुन नोटीसा निघतात.

**विजय पाटील :-**

आम्हाला तसे आदेशच आहेत की, रोटेशन पध्दतीने जाहिरात देण्यात यावी आणि त्याप्रमाणे ही नोटीस आम्ही सामान्य प्रशासन विभागाकडे वर्ग केली आणि त्यांनी ती दिलेली आहे.

**जयंत पाटील :-**

पत्रकारामध्ये रोटेशन आहे का?

**विजय पाटील :-**

पेपरमध्ये रोटेशन आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याबाबत मी खुलासा करतो की, आपल्याकडे जिल्हा स्तरावरची जी पत्राची यादी आहे.

**जयंत पाटील :-**

मग तुम्हाला इथे एक नोटीस लिहावी लागेल की, ह्या शनिवारी हा पेपर वाचा, पुढच्या मंगळवारी हा पेपर वाचा.

**प्रभात पाटील :-**

मी मघाशी तेच म्हटले ना, की तुम्ही रोटेशन पध्दत आम्हाला सांगा. आम्हाला तुमची यादी द्या.

**जयंत पाटील :-**

हे लोकांना कळणार कसे? हे रोटेशन आपण कोणाच्या सोयीसाठी केलेले आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

राज्य शासनाच्या जिल्हा माहिती अधिकारी या खात्याकडून अशा सुचना आहेत. राज्य शासनाची मान्यता प्राप्त दैनिक साप्ताहिक किंवा हे जे पेपर्स, जिल्हा स्तरावर, राज्य स्तरावर निघतात. एकाच पेपरला जाहिराती जाऊ नये असा त्यांच्यातसुध्दा खुप मोठा वाद आहे. त्यासाठी प्रत्येक जिल्हा लेव्हलची सुची घेऊन त्या कार्यालयामध्ये त्याचे रजिस्टर मेन्टेन केले जाते आणि आपल्या कामकाजाच्या अनुषंगाने ज्या जाहिराती काढल्या जातात आणि ती देण्याची आपली जी पध्दत आहे. ती रोटेशन सिस्टमप्रमाणे म्हणजे समजा पहिल्या दोनला एखादी जाहिरात दिली तर दुसरी जाहिरात जी येईल ती त्याच्या नंतरच्याला आणि तिसरी जाहीरात जी येईल ती त्याच्या नंतरच्याला आणि तिसरी जाहिरात त्याच्यानंतर हा रोष्टर आपल्याकडे मेन्टेन होतो. आपल्याकडे नाही, तर सर्व महापलिकेमध्ये अशीच पध्दत आहे. त्याच्यामध्ये इक्वल डिस्ट्रीब्युशन की, सगळ्या पेपरला जाहिरात मिळाव्यात. दै. सागर हा पेपर छोटा नाही. असा आपला गैरसमज नको की, कोणी ती जाहीरात अशीच दिली आहे. वस्तुस्थितीची जरी आपल्याला कल्पना नसेल तरी सभागृहासमोर ही बाब आलेली आहे. अजुन त्याच्यामध्ये २० तारखेपर्यंत मुदत आहे.

**जयंत पाटील :-**

साहेब, प्रश्न असा आहे. ठिक आहे, आमचे त्याबाबतीत म्हणणे नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

पेपरमध्ये काय होते, एकच पेपर आपल्याला शहरामध्ये प्रामुख्याने वाचला जातो म्हणून सर्व जाहिराती जर त्या एकाच पेपरला देणे हेही शक्य नाही.

**जयंत पाटील :-**

पण ह्या गोष्टी लोकांना कसे काय कळणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्वांना माहित आहे. रोटेशन सिस्टीम आहे. माझ्या माहितीप्रमाणे जे कोणी टेन्डर भरणारे असतात त्यांना ह्याची कल्पना आहे.

**जयंत पाटील :-**

टेन्डर भरणाऱ्याला कल्पना आहे. तेच तर म्हणतोय आम्ही. म्हणजे त्यांच्या सोयीसाठी हे सगळं आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मला वाटते आपल्याला ह्याची कल्पना असायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

कल्पना असती तर हा विषयच काढलाच नसता.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या जाहीराती निघतात ह्याच पध्दतीने दिले जाते. स्थायी समिती मंजुरी देते हा आपला सगळ्यात पहिला प्लॅटफॉर्म आहे. जाहिरात कशी निघते ही प्रशासकीय बाब आहे आणि त्याच्यामध्ये ओपननेस असावा त्याच्याबद्दल दुमत नाही.

**जयंत पाटील :-**

साहेब, आम्हाला त्या गोष्टीशी घेणं-देणं नाही. आम्हाला टेन्डर घ्यायचे नाही. परंतु, ज्या लोकांना टेन्डर घ्यायचे आहे त्यांना कळले पाहिजे. हे जर कॉम्पीटिशनमध्ये चालणार असेल तर त्याचा फायदा महापालिकेला होईल. आज एकानेच टेन्डर भरायचे, गुपचूप आणि बाकीचे दोन त्याचेच असतील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्या तारखेमध्ये एक्स्टेन्शन द्यायचे का?

**जयंत पाटील :-**

ते म्हणत नाही मी.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांनी जे आक्षेप नोंदवतात ते मान्य नाही.

**जयंत पाटील :-**

टेन्डर भरणारी लोक आहेत त्यांना हे कळल पाहिजे

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण निश्चितपणे एक्स्टेन्शन देऊ शकतो.

**प्रभात पाटील :-**

आयुक्त साहेब, या भावनामध्ये, या सभागृहामध्ये या विषयावर किती चर्चा झाली होती. मग ह्यातल्या एकाही सदस्याला कॅन्टीनच्या टेन्डरची माहिती नसेल तर ही फार दुर्देवाची गोष्ट आहे.

**गजानन भोईर :-**

साहेब, आपल्या माहापालिकेचा फायदा व्हावा.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपल्या माहितीस्तव सांगतो की, त्यांनी जर त्यादृष्टीने लक्ष ठेवले नाही तर त्यांना कसे माहित होईल. सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब ह्यांनी म्हटल्याप्रमाणे टेन्डर कोण पाहतच नाही. एकदा प्रशासकीय मंजुरी दिल्यावर ते काम झाले की नाही ह्याच्याबद्दल चर्चा होते. पण ते कोणत्या पेपरला आले एवढी चर्चा कधी झालेली नाही.

**प्रभात पाटील :-**

आम्ही प्रत्येक वेळेला विचारतो की, कॅन्टीनचे काय झाले? ह्यातला प्रत्येक सदस्य विचारत होता. पण कधीतरी प्रशासनाने आम्हाला सांगायचे होते ना, प्रभात ताई किंवा गजानन भोईर कॅन्टीनचे टेन्डर निघाले आहे.

**गजानन भोईर :-**

महानगरपालिकेला १४ लाख रुपये मिरा रोडच्या बाजाराचे जास्त मिळाले आहे. उद्या जर दहा हजार रुपयापेक्षाही जास्त मिळू शकेल. आमचा विषय असा आहे की, लवकरात लवकर कॅन्टीन चालू होऊ द्या आणि महानगरपालिकेला फायदा होऊ द्या.

**रतन पाटील :-**

आमचेही हेच उद्दीष्ट आहे दुसरे काही नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आता आपण कार्यालयीन कार्यवाही करतोय.

**प्रभात पाटील :-**

तेच म्हणातोय ना, कधी प्रशासनाने छाती ठोक का नाही सांगितले? तुम्ही ज्या विषयाबद्दल बोलत होता त्या विषयावर आम्ही अशी पुर्तता केली.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तेच सांगतोय, करतोय म्हणून सांगतोय ना.

**गजानन भोईर :-**

आता विचारले तेव्हा सांगितले.

**प्रभात पाटील :-**

आता विचारले म्हणून, आता विषय काढला नसता सन्मा सदस्य गजानन भोईर बोलले नसते तर या सभागृहाला काही माहितच पडले नसते.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जर आपल्याला काही शंका असेल तर आपण ॲड वाढवू शकतो.

**गजानन भोईर :-**

नको. आपण लवकरात लवकर ते कॅन्टीन द्यावे.

**रतन पाटील :-**

उपायुक्त साहेब, मी ह्या बाबतीत एक सुचना मांडतो. आपण जे टेन्डर काढतो त्या टेन्डरची कॉपी स्थायी समितीच्या वेळी गोषवाऱ्यासोबत जोडा. असे जोडता येते का? आता जो प्रश्न उपस्थित झाला त्या संदर्भात, त्यामुळे असे लावता येते का? पेपरला आपण जी प्रसिध्दी करतो त्याची प्रत माहितीसाठी जोडण्यात येऊ शकते का?

**मिलन पाटील :-**

आपण सचिवांना सांगा. सचिवांनी जर आपले ऐकले तर आपल्याला प्रत जोडून देतील.

**गजानन भोईर :-**

त्यापेक्षा तळ मजल्यावर बोर्ड लिहा.

**रतन पाटील :-**

पारदर्शक प्रशासन आहे ना.

**प्रभात पाटील :-**

आणि नगरपालिकेला चार पैसे देखील मिळतील.

**रतन पाटील :-**

आपण पारदर्शक प्रशासन असे म्हणून अहवाल दिलेला आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, प्रकरण क्र. ०२ चे काय झाले?

**मा. सभापती :-**

प्रकरण क्र.०२ चा जो विषय आहे, त्याबाबत आयुक्त साहेबांना त्याच्यावर प्रथेप्रमाणे तयारी करुन त्यांनीच त्याचे अवलोकन करावे. आपल्यावर जबाबदारी कशाला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

ठिक आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

काय ठरले?

**गजानन भोईर :-**

आयुक्त साहेबांनी ते बघावे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मग हा विषय स्थायी समितीसमोर कशाला आणावा?

**मा. सभापती :-**

स्थायी समितीच्या सभेपुढे आणावे लागते.

**गजानन भोईर :-**

सभापती साहेब सांगतात की, आयुक्तांनी कार्यवाही करावी.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याला जिम्मेदार कोण?

**मिलन पाटील :-**

आयुक्त साहेबांनी कार्यवाही करायची होती मग आमच्या समोर विषय आणायचा कशाला? त्यांचा अधिकार त्यांना आहे. मग त्यांनी त्याचा वापर करायचा होता. असे थोडेच आहे. स्थायी समिती कशाला आहे? जे काही गैरप्रकार झालेले आहेत ते आपण स्थायी समितीसमोर आणले आहे ना. मग स्थायी समितीला कळू दे.

**ज्युडी डिसोझा :-**

गैरप्रकार असेल तर त्याला आम्ही जिम्मेदर नाही. आयुक्त साहेब जिम्मेदार राहतील.

**मा. सभापती :-**

मी तेच सांगितले की, जबाबदार आयुक्त राहतील. ही जबाबदारी त्यांनी त्यांच्यावर घ्यावी.

**रतन पाटील :-**

सभापती साहेब, प्रकरण क्र.२ करिता सेपरेट सभा घ्या.

**जयंत पाटील :-**

सभापती साहेब, हा विषय जो आहे, लेखा परिक्षणाचा जो अहवाल आपल्यासमोर सादर केलेला आहे त्याचे आपण फक्त निरिक्षण करायचे आहे आणि त्याची संपूर्ण जबाबदारी ही त्या डिपार्टमेन्टची आहे. त्यांनी तो अहवाल ज्या क्वेरीज काढलेल्या आहेत, महालेखापालांनी ज्या क्वेरीज काढलेल्या आहेत त्या दुरुस्त करुन, त्या सुधारणा करुन तो सगळा अहवाल त्यांनी ज्या महालेखापाल कार्यालयाकडे तात्काळ पोहचवायच्या आहेत, अनुपालन अहवाल आयुक्तांनी तिथे तत्काळ सादर करायचे आहेत. त्याच्यात आपला काही भाग येत

नाही. आपण फक्त निरिक्षण करायचे आहे. ते संपूर्ण काम त्यांचेच आहे. आपले काही नाही. त्यांना ते करावेच लागणार आहे. त्यांनी ह्या ज्या क्वेरीज काढल्या आहेत तरी त्यांना करावेच लागणार आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य आपले म्हणणे बरोबर आहे. क्वेरीज काढायच्या आणि जी वसुली आहे ती वसुलीसुध्दा निकाली वसुली.

**जयंत पाटील :-**

त्या क्वेरीज.

**गजानन भोईर :-**

विजय पाटील आपली तयारी आहे का?

**प्रभात पाटील :-**

विजय पाटील ह्यांना विचारा ना, त्यांची कुठपर्यंत तयारी आहे?

**मा. सभापती :-**

आयुक्त साहेबांनी त्याप्रमाणे तशी कार्यवाही करावी.

**गजानन भोईर :-**

आपण ऑडीटचे पॉईन्ट तयार केले आहेत का?

**रतन पाटील :-**

वसुलीसुध्दा आणि त्याचा परत अहवाल आम्हाला पाहिजे आहे.

**मा. सभापती :-**

तशी त्यांनी कार्यवाही करावी.

**जयंत पाटील :-**

ते तसे आपल्याला त्यांनी कळवायला पाहिजे होते आणि ते त्यांनी आपल्याला कळवले.

**रतन पाटील :-**

ते कळवू त्याची पुर्तता झाली का नाही हे ही कळवायला पाहिजे होते.

**विजय पाटील :-**

ऑडीटचे जे पॅरे आहेत ते तयार आहेत. नाकाडी साहेबांकडून तपासून आयुक्त साहेबांकडून त्याला मान्यता घेऊन आम्ही स्थायी समितीसमोर ठेवून अनुपालनासाठी गर्व्हरमेन्टकडे सादर करणार आहेत.

**मिलन पाटील :-**

हे तुम्ही आता तयार केले आहेत की, त्यावेळीच तयार केले होते आणि ह्याला इतका वेळ का लागला?

**विजय पाटील :-**

साहेब, १९८५ पासून ते १९९९ पर्यंतचे ऑडीट आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

सन २००२ पर्यंत.

**जयंत पाटील :-**

महापालिकेपासून आत्तापर्यंत.

**विजय पाटील :-**

१९९९ पर्यंतचे जे ऑडीट आहे तर १९८५ चा रेकॉर्ड शोधायचा आहे. प्रत्येक पासबुकमधील इन्ट्री शोधायची त्याला एवढा वेळ जाणार आणि ते सगळे तयार केलेले आहेत आणि वेळोवेळी आम्ही लेखा विभागाशी त्याबाबतीत संपर्कात आहोत. त्यांच्याकडून आम्ही मार्गदर्शन घेत आहोत आणि स्पेशल ऑडीटचे हे जे एवढे पॅरे आहेत ते सर्व तयार केलेले आहेत.

**गजानन भोईर :-**

ते किती पानाचे आहे?

**विजय पाटील :-**

३७ मुद्दे आहेत.

**गजानन भोईर :-**

एवढे पॉईन्ट पण आम्हाला दिले असते तर आम्हालाही त्याच्यावर आभ्यास करता आला असता. हे पॉईन्ट न देण्याचे कारण काय?

**रतन पाटील :-**

विजय पाटील साहेब, ह्या क्वेरीज काढलेल्या आहेत पण त्याच्या जोडीला जे आर्थिक क्वेरी काढलेल्या आहेत त्याच, त्याचीपण वसुली व्हायला पाहिजे.

**प्रभात पाटील :-**

त्याच्यामध्ये काहींच्या ज्या थकबाकी आहेत, वसुली आहेत ते मुद्दे काढले का?

**रतन पाटील :-**

नुसते फक्त तुम्ही कागदपत्री काढले की, आर्थिक क्वेरी वसुल होणार आहे.

**गजानन भोईर :-**

म्हणजे मागचे जे झाले त्या सगळ्याला आम्ही मंजुरी देतो असे ना.

**जयंत पाटील :-**

आपण मंजुरी कुठे देत आहोत?

**गजानन भोईर :-**

मंजुरी देत नाही. पण चर्चा करणार की ......

**जयंत पाटील :-**

स्थायी समितीसमोर सादर केले ते अनुपालनासाठी ते पुढे सादर करणार आहोत.

**सुधीर नाकाडी :-**

सन्मा. सदस्य अनुपालन म्हणजे जर एखादी वसुलीसारखी असेल एक लाख चोवीस हजाराप्रमाणे......

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आक्षेपार्ह अधिन ज्या रक्कमा येतात, ज्या पुर्तता करायच्या बाबी राहून गेलेल्या असतात त्याचे परत रिव्हॉल्युशन करुन, परत पाहणी करुन जे करणे शक्य आहे ते करुन मा. आयुक्त साहेबांची मान्यता घेऊन संबंधित जे लेखा काढलेले आहे त्यांना ते सादर करणे. पण तो पॅरा त्यांना मान्य झाला की त्यांनीही पुर्तता केलेली आहे. ह्याच्यामध्ये क्षम्य आहे. तर तो डिलीट करणार. एखाद्या रक्कमा वसुल होण्यासारख्या असतील तर त्या निश्चित वसुल करुन तसा अहवाल त्यांच्याकडे सादर करावा लागतो. उदा. आमच्या काळातील एक बाब सांगतो. गेल्यावर्षी २८ लाख रुपये संबंधित ठेकेदाराकडून जकातचे येणे अपेक्षित होते. आम्ही ती पूर्ण रक्कम विथ इंटरेस्ट ती मागच्या दहा दिवसात वसुल केली. तो पॅरा आता आम्ही त्यांना सादर करणार. तर तशा बाबी कोणत्या राहिल्या आहेत. ह्याच्यामध्ये प्रशासन गांर्भीयाने घेऊन कार्यवाही करत नाही का? ह्याची आपल्याला कल्पना असावी म्हणून हा अहवाल नियमाप्रमाणे आपल्या समोर सादर केलेला आहे. वेळोवेळी पुर्तता होत आहे.

**जयंत पाटील :-**

ह्याची संपूर्ण जबाबदारी तुमचीच आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

साहेब, आपण वेळोवेळी पुर्तता न करता, सरकारचे जकातीचे जे होते ते दोन वर्ष पुर्वीचे होते आणि आपण सांगता की, आता मी २८ लाख रुपये वसुल केले.

**सुधीर नाकाडी :-**

त्यांच्याकडून ते विथ इंटरेस्ट वसुल झाले आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दोन वर्षाचा इंटरेस्ट घेऊन वसुल केले.

**प्रेमनाथ पाटील :-**

एवढा विलंब, आपण त्यांचा ठेका संपल्या संपल्या ती रक्कमा वसुल करायला पाहिजे होती.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते समोरच्याने मान्य करावे लागते ना. उदा. एक देणेदार असतो. त्याला ही रक्कम येणं आहे असे आपण म्हणतो तो जर मान्य करत नसेल त्याने कागदपत्र सादर केले व त्यांची निगोशिएशनने कार्यवाही व्हायला वेळ घेतोच असे नाही की, ते एका दिवसात फायनल होईल.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो की, ह्या अहवालाबद्दल आम्ही खुप आभ्यास केला आहे. ह्याच्यामध्ये तसे काही नाही म्हणजे आपल्या कर्मचाऱ्यांनी फार मोठा भ्रष्ट्राचार केलेला नाही. पण बँकेचे जे रि-कन्सलेशन व्हायला पाहिजे ते झालेले नाहीच. उदा. समजा, आता शिवजयंती आली. मला ५०० रु. दिले. पण १०० रु. हाराकरिता खर्च झाले तर ४०० रु. मी परत द्यायला पाहिजे. तर ते परत दिलेले नाहीत आणि लेखापालांनीही ते त्यांच्याकडून परत घेतलेले नाही किंवा त्यांना नोटीसा देऊन त्यांच्या पगारातुन ती रक्कम वसुल करायला पाहिजे होती. असे १०-१०, २०-२० हजार रुपये आहेत. कुठे पन्नास हजार रुपये आहेत तर कुठे पंचवीस हजार रुपये आहेत. ते त्यांच्याकडून वसुल व्हायला पाहिजे होते. ही ह्यांची जबाबदारी आहे. त्यांनी त्यांची ही जबाबदारी धुडकावलेली आहे. कारण कर्मचारी आपले आहेत. पण त्या कर्मचाऱ्यांकडून वसुल करणे, नाहीतर त्यांच्या पगारातुन काढून घेणे. त्यांचा पगार चालू राहिला.

**मा. सभापती :-**

ह्याचा अर्थ असा की, त्यांनी वेळेवर त्याचा विचार केला नाही.

**मिलन पाटील :-**

हा जो काही कारभार झाला तो विजय पाटील ह्यांच्या आवाक्याच्या बाहेरचा होता आणि त्यांनी ते वेळोवेळी टाईमशीर केले नाही. म्हणून आज हे ऑडीट पॉईन्ट त्यांच्या माथी पडलेले आहे.

**प्रभात पाटील :-**

सभापती महोदय, अशा ज्या काही त्रुटी आहेत. मला असे वाटते सन्मा. विजय पाटील साहेब, खतगावकर साहेब, नाकाडी साहेब, ह्यांनी त्या त्रुटी पूर्ण कराव्यात. त्या रक्कमा वसुल करण्याचे तुम्ही सर्वांनी ते धाडस दाखवा आणि ते करुन दाखवा. काही मुद्दे वगळता येण्यासारखे असेल तर नक्की आम्ही त्याचे स्वागत करु आणि असा संबंधित सगळा अहवाल तयार करुन तो तुम्ही पाठविण्यात यावा. परंतु, पाठविल्याची एक प्रत आमच्या माहितीसाठी की, तुम्ही काय अहवाल पाठवला. हे कृपा करुन स्थायी समितीचे सदस्य म्हणून आम्हाला देण्यात यावे. असा मी ठराव मांडते.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, आम्हाला वाटले होते की, श्री. बेलवटे जरा जास्त शिकलेले आहे पण त्यांनीसुध्दा हीच चुक मागच्यावेळी ओढलेली आहे. आम्ही समजत होतो की ते फार हुषार आहेत. त्यांचीसुध्दा बँकेचे अकाऊन्ट काही ठिकाणी कमी झालेले आहे. बँकेच्या ठिकाणी जी रक्कम जास्त व्हायला पाहिजे ती झाली नाही. त्यांनीसुध्दा अकाऊन्ट केलेले नाही. त्यांची चुक फक्त एवढीच की, त्यांनी बँकेत आपल्याबरोबर जाऊन करायला पाहिजे होते. काही काही गोष्टीत त्यांच्यावरही आक्षेप घेतलेला आहे. तो त्यांच्या चुकीमुळे घेतलेला आहे. त्यांची जी चुक आहे ना, त्या चुकीपाई घेतलेला आहे.

**प्रभात पाटील :-**

ते सुधरतील ना, आपण ते सुधारुन शासनाला सादर करावे आणि एक कॉपी आम्हाला देण्यात यावी.

**मिलन पाटील :-**

आपण ते आयुक्त साहेबांच्या लेव्हलला करुन जो काही अहवाल आपण सादर कराल तो अहवाल आपण आम्हाला दाखवा.

**शरद बेलवटे :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील मी तुम्हाला एक्सप्लेन करतो, त्याच्यामध्ये पान क्र.५ वर ..

**मिलन पाटील :-**

हे मी केलेल नाही. ऑडीटरने केलेले आहे. आम्ही तुमच्यावर काय केलेले नाही. पण जे काय केलेले आहे ते योग्य. आम्ही तुम्हाला फार हुषार समजत होतो. पण तुमच्याकडूनसुध्दा काय चुका झालेल्या आहेत.

**शरद बेलवटे :-**

४२ लाख ५८ हजार रुपये इंटरेस्ट मी करन्ट अकाऊन्टवर मिळवलेले आहे.

**मिलन पाटील :-**

तो भाग वेगळा आहे.

**शरद बेलवटे :-**

करन्ट अकाऊन्टवर ती बँक शॉर्ट टर्मवर पंधरा-पंधरा दिवसाला फिक्स करते.

**मिलन पाटील :-**

ह्याच्यात तुमच्यावर जो आक्षेप ओढला आहे त्याबद्दल आम्ही फक्त बोलत होतो. आम्ही तुमच्यावर काय ओढलेले नाही.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या मंजुरीने आणि सन्मा. सदस्यांच्या याठिकाणी आलेल्या सुचना विचारात घेऊन लेखापरिक्षणाच्या निपटऱ्याबाबत मा. आयुक्त साहेबांनी दर महिन्याला याबाबत बैठका घेऊन उपलेखापरिक्षक आणि मुख्य लेखाधिकारी ह्यांचे गठीत समितीमार्फत पुर्तता करण्याच्या अनुषंगाने ऑलरेडी कार्यवाही सुरू केलेली आहे आणि आपल्या सुचनेप्रमाणे भविष्यात सुद्धा ह्याच्यावर कार्यवाही करुन मॅक्झीमम जे काही पॅरे आहेत ते निर्ष्कषीत करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही केली जाईल आणि त्याचा अहवाल आपल्यासमोर सादर केला जाईल.

**मा. सभापती :-**

हे करत असतातना जेणेकरून आपले नुकसाण होणार नाही. ज्या वसुली आहेत त्या वसुली करण्याचा आपण शक्यतो प्रयत्न केला पाहिजे.

**रतन पाटील :-**

साहेब अवधी किती जाईल?

**मा. सभापती :-**

आपण हे लवकरात लवकर करावे.

**मिलन पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये आर.ओ.बी.चे आलेले नाही.

**प्रकरण क्र. ०२**

मा. स्थायी समिती सभा दि. २८/०३/२००६ रोजी सादर केलेले प्रकरण क्र. २०३ सन २००४-०५ या वित्तीय वर्षाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणे.

**ठराव क्र. ०२ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(३) नुसार मुख्य लेखापरिक्षकांनी सन २००४-२००५ सालाचा वार्षिक लेखापरिक्षण अहवाल मा. स्थायी समितीस सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने मुख्य लेखापरीक्षकांनी काढलेल्या आक्षेपांचे तसेच केंद्र शासनाच्या महालेखापरीक्षक, मुंबई यांनी काढलेल्या आक्षेपांची पुर्तता संबंधित विभागानी तात्काळ करुन तसा अनुपालन अहवाल मुख्य लेखापीरक्षकांना व महालेखापरीक्षकांना सादर करावा व तसे केल्याचे स्थायी समितीस कळवावे असे आदेश देण्यांत येत आहेत.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. मिलन पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०३ चे वाचन केले.)

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम ९४ च्या १ च्या तरतुदीच्या अनुषेगाने महापालिकेचा प्रशासकीय अहवाल प्रत्येक फायनानशियल वर्षाच्या १ एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात स्थायी समितीकडे सादर करणे अपेक्षित आहे. ह्या वर्षाच्या अहवालीची आम्ही तयारी करत आहोत. हे मागच्या वर्षाचे अहवाल आहे. येणारा अहवाल सुद्धा आम्ही तात्काळ सादर करणार आहोत. प्रशासकीय अहवालामध्ये आपल्याकडे कार्यान्वित असलेले विभाग त्या अनषंगाने अधिनिस्त असलेले कर्मचारी ह्याच बेसीफिकेशन आतापर्यन्त मंजुर पदाचा तपशिल ह्याच्यावर खर्च होणारी रक्कम प्रशासकीय स्वरुपाच्या पूर्ण संस्थेची माहिती आपण एखाद्या संस्थेचे जे कार्यवृत्तांत वर्षाचे पब्लिश करतो त्या टाईपचे हे लेखे आहेत आणि ते मागच्या वर्षीचे आपण आपल्यासमोर सादर केलेले आहे. आपल्या अवलोकनाच मान्य झाल्यानंतर त्याला रि-प्रिन्ट करुन सर्व महापालिकेच्या सदस्यांच्या घरपोच केली जातील. ह्या वर्षीचा अहवाल सुद्धा आम्ही सादर करणार आहोत. ह्यात प्रशासकीय स्वरुपाची विभागनिहाय माहिती आहे. ती पुस्तिका आम्ही तयार केलेली आहे. ह्याच्यामध्ये आपल्या अजून काही सूचना असतील, काही धोरण असेल की, ह्या टाईपची ही माहिती असायला पाहिजे तर नव्याने आम्ही जो अहवाल तयार करून तो समावेश केला जाईल. ह्या विभागात किती कर्मचारी आहेत? त्याचा दर्जा काय आहे? स्केल काय? ही डिटेल देण्याचा आम्ही प्रयत्न केलेला आहे. ती पुस्तिका होती आम्ही आल्यावर तयार केली होती. ह्या वर्षीची आम्ही समायोजन करु.

**मा. सभापती :-**

सादर करुन त्याची पुर्तता करा.

**रतन पाटील :-**

वाहनाचे जे दिलेले आहे ते चालू वाहने आहेत की बंद वाहने आहेत? ६९ वाहने दिलेली आहेत. ती चालू आहेत की, बंद आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

२५ वाहने बंद आहेत आणि ट्रॅप करण्याची कार्यवाही आम्ही प्रस्तावित केलेली आहे.

**रतन पाटील :-**

हे जे ६९ वाहन दिलेली आहेत त्यातील २५ वाहने बंद आहेत का?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एकूण ७२ वाहने आहेत.

**प्रकरण क्र :- ०३**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार प्रशासन अहवालाबाबत (दि. २८/३/२००३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. २३४.)

**ठराव क्र. ०३ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ नुसार आयुक्तांनी प्रशासन अहवाल लवकरात लवकर स्थायी समितीस सादर केला पाहिजे अशी तरतुद आहे. त्यानुसार आयुक्तांनी दि. १७/०४/२००६ रोजी सन २००४-०५ चा प्रशासन अहवाल सादर करण्यांत आला.

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०४ चे वाचन केले.)

**प्रेमनाथ पाटील :-**

महापौर चषकासाठी बजेटमध्ये किती अमाऊन्ट ठेवली आहे?

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, महापौर चषकमध्ये यावर्षी कबड्डीचा खेळ घ्या.

**दिपक खांबित :-**

ह्या वर्षीच्या अर्थ संकल्पात महापौर चषक आणि इतर स्पर्धेकरिता पस्तीस लाखाची तरतुद केली होती. त्याच्यातून मागच्या मिटींगला मॅरेथॉन स्पर्धेच्या वेळी पंधरा लाख घेतले आणि वीस लाख राहिले आहे. त्यामुळे ह्या वीस लाखमधूनच आपल्याला खर्च करायला लागणार आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

आपली एक समिती आहे त्याच्यामध्ये आपण ४५ लाख रुपये असे काही ठेवले होते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ती क्रिडा समिती वेगळी आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्याच्यामधूनच ही रक्कम घेणार का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते वेगळे आहे आणि हे वेगळे आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याच्यामधुन घ्या.

**गजानन भोईर :-**

महापौर चषकामध्ये आपण कोणकोणते खेळ घेतले आहे?

**दिपक खांबित :-**

कुस्ती, कबड्डी, खो-खो, क्रिकेट आणि शुटींग बॉल आहे. आपण ठरवा ह्यातून कोणत्या घ्यायच्या आहेत.

**गजानन भोईर :-**

आपण हा जो एवढा खर्च करतोय तर सुभाषचंद्र बोस मैदानाजवळ कोणी ही माणसे नसतात. फक्त खेळाडूच बघणारे असतात. या स्पर्धा आपल्या लोकांनी बघू दे. नवघर शाळेच्या ग्राऊण्डमध्ये कबड्डी, कुस्ती हा खेळ ठेवा.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, ह्याच्यामध्ये कबड्डीची स्पर्धा घ्या.

**दिपक खांबित :-**

कुस्ती हे नॉमिनल ठेवायचे आहे. कुस्ती आणि शुटींग बॉल ह्या स्पर्धा आपण ठरवा.

**सुर्यकांत भोईर :-**

फक्त लोकल घ्या.

**गजानन भोईर :-**

तिथे फक्त क्रिकेट ठेवा. तिथे बघायला कोणी नसते. पैशाचा नुसता दुरुपयोग होतो. लोकांना बघू द्या. आपण नवघरच्या मैदानात खेळ ठेवा.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य गजानन भोईर जेवढे पुर्वेवाले पैसे भरतात तेवढेच पैसे पश्चिमकडचे भरतात. दोन स्पर्धा तिथे तर दोन स्पर्धा इथे.

**रतन पाटील :-**

आपण पैसे खर्च कशाला करतो?

**गजानन भोईर :-**

तुम्ही माणसे आणा, स्पर्धा बघायला.

**मिलन पाटील :-**

दोन स्पर्धा येथे तर दोन स्पर्धा तिथे.

**रतन पाटील :-**

महापौर चषकाला उशिर झालेला आहे.

**गजानन भोईर :-**

सुभाषचंद्र बोस मैदानात स्पर्धा बघायला माणसे नसतात फक्त फिरायला असतात.

**सुर्यकांत भोईर :-**

साहेब, मॅरेथॉन स्पर्धा कधी आहे?

**दिपक खांबित :-**

ऑगस्ट महिन्यात, पावसाळ्यात.

**सुर्यकांत भोईर :-**

तेव्हा आम्ही नसू.

**रतन पाटील :-**

शाळेमध्ये महापौर चषक घ्या. आपल्या शाळेतील विद्यार्थीसुद्धा महापौर चषकामध्ये सहभाग घेतील.

**मोहन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटील ह्यांचे म्हणणे अतिशय योग्य आहे. आपल्या मताशी आम्ही सहमत आहोत. परंतु, क्रिडा, सांस्कृतिक समितीची आपण जी स्थापना केलेली आहे. त्याच्यामार्फत आपण जे सांगितले आहे त्याची तरतुद केली आहे. त्यावेळेला शैक्षणिक क्षेत्रामध्ये, कालावधीमध्ये आपण त्या स्पर्धा शाळेमध्ये भरु. आत्ता आपल्याला महापौर चषक स्पर्धा भरवायचा आहे. त्यात वीस लाखाची तरतुद आहे. त्याच्यामध्ये स्पर्धा भरवू.

**गजानन भोईर :-**

१३ नंबर शाळेमध्ये त्या स्पर्धा ठेवायच्या.

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ०४ चा ठराव सभागृहासमोर मांडला.)

**एस्. ए. खान :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती :-**

ठराव मंजुर करण्यापुर्वी माझी अशी सुचना आहे की, आपण या मिरा भाईंदर शहराच्या नागरिकांसाठी हा प्रोग्राम केला जातो. तर जे जे आपले ग्राऊण्ड आहेत, जसे नवघर, गोडदेव येथे ग्राऊण्ड आहे तिथे खेळ भरवण्यांत यावे.

**रतन पाटील :-**

साहेब हे एका दिवसात, घाईगर्दीत करु नका. याची पुन्हा एकदा व्यवस्थित प्रसिद्धी करा. प्रसिद्धी होत नाही. सभापती साहेब, महापौर चषकाची प्रसिद्धी करा. व्यवस्थित प्रसिद्धी होत नाही.

**प्रकरण क्र. ०४ :-**

महापौर चषक २००६ अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव क्र. ०४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत दरवर्षी महापौर चषक अंतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन करण्यांत येते. राज्यातील खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने राज्यस्तरीय कुस्ती, कबड्डी, खो-खो, शुटींग बॉल व मिरा भाईंदर क्षेत्रातील खेळाडूंकरीता क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यांत येते. चालू वर्षात देखिल अशा प्रकारे स्पर्धेचे महापौर चषक स्पर्धेतर्गत आयोजन करावयाचे आहे. सन २००६-०७ या वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद उपलब्ध आहे. सदर कामी विविध स्पर्धेचे नियोजन व आयोजन मा. स्थायी समिती सदस्य व महानगरपालिका अधिकारी यांच्या विविध खेळांकरिता स्वतंत्र कमिटी तयार करुन करण्यात याव्यात. सदर स्पर्धेचे आयोजन करणेकामी विविध संघटनेची फी, स्पर्धक, आयोजक, पंच यांचा प्रवासभत्ता, मानधन, खानपान व्यवस्था, मंडप, स्टेज इ. व्यवस्था बैठक व्यवस्था करणे, खेळांकरीता सामान खरेदी कामी रु. २०.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित असुन सदर खर्चास मंजुरी देण्यांत येत आहे. सदर खर्च निविदा मागवुन करण्यास व लागणारी अग्रीम रक्कम कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांना देण्यास ही सभा मंजुरी देत आहे. स्पर्धेच्या आयोजनाची तारीख मा. महापौर व विविध स्पर्धेचे फेडरेशन यांच्या वेळा घेऊन ठरविण्यांत याव्यात.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०५ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ०५ :-**

महालेखापाल कार्यालयाचा सन २००२-०३ ते २००३-०४ कालावधीतील तांत्रिक तपासणी अहवाल.

**ठराव क्र. ०५ :-**

महालेखापाल कार्यालयाचा सन २००२-०३ ते २००३-०४ या कालावधीतील तांत्रिक अहवाल स्थायी समितीस सादर करावा असे महालेखापाल कार्यालयाकडून दि. ३०/०३/२००६ रोजी पत्र क्र. D.O. No. LB-I/TJR-MBMC/04-05 नुसार कळविले आहे. त्यानुसार स्थायी समिती सभा दि. १७/०४/२००६ रोजी विषय क्र. ०५ नुसार सदरचा तांत्रिक अहवाल सादर करण्यांत आला. त्या अनुषंगाने सर्व विभागांनी पुर्तता करु तसा अहवाल महालेखापरिक्षकांना सादर करावा.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिव ह्यांनी प्रकरण क्र. ०६ चे वाचन केले.)

(सन्मा. सदस्य श्री. मिलन पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ०६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस्. ए. खान :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

विषय काय आहे? कसला अहवाल आहे?

**दिपक खांबित :-**

जवाहरलाल नेहरु अर्बन रेन्युअल मिशन ही केंद्र शासनाची योजना आहे. त्याच्यामध्ये आपला सहभाग करावा म्हणून मा. महासभेने मंजुरी दिली. तर त्याचा जो काही प्रोजेक्टर रिपोर्ट तयार करायचा असतो तर ज्या कंन्सल्टंन्ट कंपन्या असतात, ते प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करतात आणि तो प्रस्ताव आपण गव्हर्नमेंटला पाठवणार आहोत. ह्याच्यामध्ये ऐंशी टक्के केंद्र शासनाचा पैसा असतो, दहा टक्के राज्य शासन आणि दहा टक्के महानगरपालिकेचा पैसा असतो, हे असे आहे. त्याच्यामध्ये दोन प्रोजेक्ट आहेत, अंडरग्राऊण्ड रिन्युअल सिस्टम प्रोजेक्ट आहे २६० कोटीचा आणि शहरामध्ये जे पक्के नाले बनवायचे आहेत २२२ कोटीचा असा आपला पाचशे कोटीचा प्रोजेक्ट आहे. तो आपल्याला ह्या योजनेमधून घ्यायचा आहे.

**जयंत पाटील :-**

हे जे तिन्ही कन्सल्टंन्ट आहेत हे तिघे गव्हर्नमेंट अप्रुव्हड आहेत का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्यांना कामाचा अनुभव आहे का?

**दिपक खांबित :-**

गव्हर्नमेंटच्या कामाचा ह्यांना अनुभव आहे. त्यांनी सगळ्यांनी कामे केलेली आहेत.

**जयंत पाटील :-**

मला असे म्हणायचे आहे की, ट्रेंडी सिस्टम जी आहे तो एक करोड तेवीस लाख म्हणतोय आणि आपण वाटाघाटीनंतर ३५-२६ म्हणजे एवढा डिफरन्स जो आहे. म्हणजे ह्या कन्सल्टंन्टशी नक्की काय आहे? ह्याच्यामध्ये एवढा फरक कसा काय? चार-पाच लाखाचा, दहा लाखाचा इथे-तिथे होईल.

**दिपक खांबित :-**

नाशिक महानगरपालिकेने हे सगळे केले तर त्यांना जवळ जवळ.........

**ज्युडी डिसोझा :-**

तीन नंबरचा डिफरन्स किती आहे?

**जयंत पाटील :-**

एवढा डीफरन्स कसा काय? म्हणजे हे नक्की ह्यांचे काय कन्सल्टंन्सी करतात?

**दिपक खांबित :-**

साहेब, ह्यांच्याकडे टेक्निकल स्टाफ असतो.

**जयंत पाटील :-**

हे तिघे कन्सल्टंट एकच तर नाही ना?

**दिपक खांबित :-**

नाही, हे तिन्ही कन्सल्टंट वेगवेगळे आहेत.

**जयंत पाटील :-**

आपण सभागृहाला माहिती द्या की, एवढा फरक का येत आहे?

**दिपक खांबित :-**

टेंडर मागवल्यानंतर त्या लोकांनी ऑफर भरले आहेत.

**जयंत पाटील :-**

म्हणजे ह्याच्यामध्ये त्यांना जास्त अनुभव आहे का? हे तीन नंबरचे जे ट्रेंडी सिस्टम आहेत ह्यांना त्याबाबतीत जास्त अनुभव आहे का?

**दिपक खांबित :-**

अनुभव ह्या तिन्ही कन्सल्टंटला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. महासभेने मान्यता दिल्यानंतर जो आपल्याला प्रोजेक्ट डॉक्युमेंट तयार करावयाचा आहे. त्याच्यासाठी बांधकाम विभागाकडून दैनिक नवशक्ती, दै. सागर या वर्तमानपत्रामध्ये सदर डॉक्युमेंटेशन तयार करण्यासाठी आवश्यक कन्सल्टंसी युनियनच्या निविदा सुचना काढल्या होत्या आणि त्याप्रमाणे आलेले हे दर होते. आपण त्यामध्ये ट्रेंडी सिस्टीमने एक कोटी तेवीस लाखाचे दर भरलेले होते. टंडन ॲण्ड असोसिएशनने ४० लक्ष ४१ हजाराचे दर भरलेले आहे आणि एस्. एस्. असोसिएशनने ६४.८७ लाखाचे दर भरलेले आहे. सर्वात लोएस्ट दरधारकास नियमाप्रमाणे वाटाघाटी करण्याचे अधिकार आहे. त्यांच्याशी निगोशिएशन केले असता ३५ लक्ष २६ हजाराची त्यांनी मान्यता दिलेली आहे. त्याच्या निर्णयासाठी मंजुरीसाठी आपल्यासमोर हे प्रकरण आहे. एका सिस्टमने फार जास्तीचे दर भरले आहेत. एकाने कमी भरले आहे तर त्यांनी ते दर कोट केलेले आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, कुठेतरी जस्टीफिकेशन पाहिजे ना.

**जयंत पाटील :-**

ह्याच्यामागे काहीतरी कारण असू शकेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आय.एस्.टी. आपण विचारातच घेत नाही.

**जयंत पाटील :-**

तो भाग नाही. तुम्ही ते विचारात घ्या हेही म्हणत नाही. आपण लोएस्टवाल्याला घेणार. पण कदाचित लोएस्टवाल्याचा जर तेवढा अनुभव नसेल त्याने निविदा भरायची म्हणून भरली असेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

टंडन असोसिएटस् ही जी फर्म आहे ती महाराष्ट्रामध्ये साधारणपणे ठाणे महानगरपालिका, भिवंडी महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका, मुंबई महानगरपालिका या वेगवेगळ्या महानगरपालिकेत काम केलेले आहे. ही एक मोठी फर्म आहे आणि कदाचित आपल्याकडे जाहिरातीमध्ये त्यांनी यापुर्वी काम केलेले आहे. डायरेक्टली त्यांच्या नावाने केलेले आहे की, नाही ह्याची कल्पना नाही.

**दिपक खांबित :-**

काम केलेले आहे. आपल्याकडे जी भुयारी गटार योजना आहे त्याचा सर्व्हेसुद्धा ह्याच असोसिएशनने केला आहे.

**जयंत पाटील :-**

ही माहिती तुम्ही आम्हांला द्या.

**दिपक खांबित :-**

त्यांच्याकडे सर्व डाटा रेडी आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ही जी एजन्सी आहे ही कन्फर्म एजन्सी आहे. चांगले काम करणारी एजन्सी आहे.

**प्रभात पाटील :-**

एवढी चांगली एजन्सी असेल आणि ती कमी दरात काम करते तर त्या आमचा काही प्रश्न येतच नाही. पण त्याच्यावर पुर्णपणे आपले नियंत्रण असले पाहिजे. चांगल्या पद्धतीने काम व्हायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

अटीशर्तीमध्ये त्यांना काही शिथीलता दिली आहे का?

**रतन पाटील :-**

काम अगदी व्यवस्थित झाले पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उपायुक्त साहेब, आमचे असे म्हणणे आहे की, ट्रेंडी सिस्टमला आपण बोलवा आणि त्यांना विचारा की, आपण हे १ करोड ३२ लाख रुपये भरले त्याचे आपण जस्टीफिकेशन द्या. समोरचा माणूस ३५ लाख, ४० लाख भरतो आणि आपण १ करोड २३ लाख तर कुठेतरी ह्याचे जस्टीफिकेशन व्हायला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

उपायुक्त साहेब, अटीशर्तीमध्ये त्यांना शिथीलता दिली आहे का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अटीशर्तीमध्ये कोणत्याही प्रकारची शिथीलता दिलेली नाही.

**गजानन भोईर :-**

असे असेल, अटीशर्ती कमी असतील म्हणून रक्कम कमी झाली का?

**मिलन पाटील :-**

ह्या असोसिएशनने भुयारी गटाराचे सर्वेक्षण केलेले आहे त्यामुळे त्यांच्याकडे हा डेटा तयार आहे आणि दुसऱ्या एजन्सीला सर्व नव्यापासुन सुरूवात करावी लागेल ना.

**प्रकरण क्र. ०६ :-**

निविदांना मंजुरी देणेबाबत. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. ०६ :-**

दि. २६/०१/२००६ रोजीचा दैनिक नवशक्ती / दैनिक सागर या वृत्तपत्रात प्रसिद्ध झालेली निविदा सुचने नुसार खालील कामांकरीता कन्सल्टंट मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| **कामाचे नांव / ठेकेदाराचे नांव** | |
|---|---|
| केंद्र शासनाच्या जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्युअल मिशन अंतर्गत प्रकल्प अहवाल तयार करणे करीता ''कंन्सल्टंट'' नेमणे. | |
| 1) S. S. Associates | रु. ६४,८७,४७४.०० |
| 2) Tandan & Associate<br>**वाटाघाटीनंतर** | रु. ४०,४१,३१०.००<br>**रु. ३५,२६,४००.००** |
| 3) Trendi System | रु. १,२३,४२,४००.०० |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता M/s Tandan & Associate यांनी सादर केलेली (रु. ३५,२६,४००.००) दराच्या निविदांस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मान्यता देण्यात येत आहे. सदर ठेकेदराचे वेळोवेळी येणाऱ्या देयकाच्या प्रदानास मान्यता देण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. मिलन पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ०७ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

परवानगी आहे परंतु.....

**गजानन भोईर :-**

नक्की हे प्रकरण काय आहे ते तर सांगा ना.

**मा. सभापती :-**

नाले साफ करायचे आहे.

**रतन पाटील :-**

आपण गाळ साफ करण्यासाठी दिलेले आहे. त्याचे आपल्याला पैसे द्यावे लागणार आहेत का? आपल्या महापालिकेचा काय खर्च होणार आहे का? जर महापालिकेचा खर्च होत नसेल तर द्यायला.....

**गजानन भोईर :-**

संपूर्ण मिरा भाईंदर शहराचे द्या. मिरा भाईंदर शहरातील नाल्याची सफाई केली तर आपण त्यांचा सत्कार करु.

**जयंत पाटील :-**

आयुक्त साहेब, मला अशी माहिती द्या की, नरेश म्हात्रे ह्यांनी दि. २८/०३/०६ ला आपल्याला लेखी पत्र पाठवले होते. ते पत्र काय आहे त्याचे वाचन करावे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

ते पत्र वाचा. त्यांनी कशासाठी पत्र पाठवले होते?

**केशव घरत :-**

साहेब, माझा प्रश्न आहे की, पुढचे नाले कोण साफ करणार आहे?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या मंजुरीने, या प्रकरणामध्ये दोन पत्र प्राप्त झालेले आहेत आणि त्या दोन्ही पत्रासह निर्णयासाठी हे प्रकरण प्रशासनाने आपल्यासमोर ठेवलेले आहे. त्यात एक पत्र २८/०३/०६ चे गणेश ट्रान्सपोर्ट ह्यांचे आहे. विषय आहे मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्र. १८ मधिल सर्व नाल्यातील गाळ काढण्याबाबत. मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालयाला ॲडरेस केलेले आहे.

(सदर पत्राचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रतन पाटील :-**

रॉयल्टी जर ते स्वतः भरणार असतील तर प्रश्नच नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

गाळ काढून उचलून घेउन जाणार असा त्यांनी त्यांच्या पत्रामध्ये उल्लेख केलेला आहे ना.

**गजानन भोईर :-**

ते रॉयल्टी भरणार आहे.

**रतन पाटील :-**

तो सरकारला मातीचे पैसे देतो. रॉयल्टी भरतो म्हणून सांगतो.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

याबाबत दुसरे एक पत्र आहे. श्रीम. ज्योत्स्ना हसनाळे, मिरा भाईंदर महानगरपालिका, नगरसेविका, आयुक्त साहेबांना ॲडरेस आहे. प्रभाग क्र. ११ मधील नाल्यातील गाळ काढण्याकरिता परवानगी मिळणे बाबत.

(सदर पत्राचे सभागृहासमोर वाचन केले.)

**गजानन भोईर :-**

गाळ काढून दे पण ती माती आपल्या जागेमध्ये पडू द्या.

**केशव घरत :-**

मग तो रॉयल्टी कसा भरणार? त्याचा उद्देश तोच आहे.

**रतन पाटील :-**

तो रॉयल्टी स्वतः घेत आहे.

**केशव घरत :-**

तो रॉयल्टी देतोय मग तुम्हाला माती कशी देणार?

**रतन पाटील :-**

तो गाळ काढतोय आणि आपल्या महापालिकेचे काम होत आहे.

**केशव घरत :-**

ह्याच्यात महानगरपालिकेचा फायदा आहे.

**गजानन भोईर :-**

माती तो दुसऱ्याला देईल ना.

**केशव घरत :-**

पण महानगरपालिकेचा ह्यात फायदा आहे.

**गजानन भोईर :-**

फायदा आहे तर पुर्ण मिरा भाईंदर शहरातील नाल्याचे गाळ काढण्याचे काम आपण त्यांना देउ या.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, या गाळातून त्याला शेणाचे उत्पन्न मिळणार आहे. महत्वाची बाब म्हणजे शेणाचे उत्पन्न मिळणार आहे. आज हे काळ शेण किंवा जुन शेण आहे. त्या शेणाच्या उत्पन्नावर त्याला नाले साफ करण्याकरिता जास्त खर्च येणार नाही आणि ती माती किंवा त्याच्या बरोबर थोडेफार माती येईल. परंतु, त्याला जस्तीत जास्त हे शेणच मिळणार आहे आणि ह्या शेणाचा भाव जो आहे हा फार आहे. आपल्याला गाळे साफ करून मिळतील आणि त्याला शेण उचलून घेउन जायचे आहे तर जाउ दे. आपली घाण ही साफ होउन जाईल. परंतु, आपले जे इंजिनिअर आहेत त्यांच्या देखरेखी खालीच हे काम झाले पाहिजे आणि त्यांना टेंडर देतील त्याप्रमाणे त्यांनी खुदाई केली पाहिजे. त्याने आपल्या कडून गाळ्याची परमिशन घेतलेली आहे आणि ते अख्ख डोंगर खोदून घेउन जातील. नाला म्हणजे नालाच साफ झाला पाहिजे.

**गजानन भोईर :-**

त्यांनी नाल्याचा उल्लेख करावा कुठपासून कुठंपर्यंत.

**मिलन पाटील :-**

हे त्यांना सार्वजनिक बांधकाम खात्याचे इंजिनिअर दाखवतील ना.

**सुर्यकांत भोईर :-**

त्याच्यामध्ये पहिले मेजरमेंन्ट घ्या. कुठुन कुठपर्यंत नाले साफ खोदणार? आम्हाला त्याचा सर्व्हे करुन माहिती द्या नंतर हे पास करा.

**मिलन पाटील :-**

बांधकाम खात्याच्या निर्देशानुसारच हे काम चालेल.

**सुर्यकांत भोईर :-**

३ लाख ९० हजाराचे अंदाजपत्रक दिले आहे ते कसे काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने, या प्रकरणाच्या अनुषंगाने मा. आयुक्त साहेबांच्या दालनात दि. १०/०४/०६ रोजी चर्चा झाली. प्रशासनाने सदरची माती जो गाळ निघेल ती विकास कामाच्या ठिकाणी टाकण्यासाठी प्रस्तावित केलेली आहे. पण संबंधित श्री. नरेश म्हात्रे ह्यांची विनंती आहे की, ती माती आम्हाला घेण्याची परवानगी द्यावी. तो रॉयल्टी देणार आणि जे हायवेचे नाले आहे ते ते साफ करणार. तो गाळ ते काढणार आणि स्वतः आपल्या कामासाठी ते वापरणार त्यामध्ये नाले असे आहे की, महाजनवाडी ते गावदेवी पर्यंतचा कच्चा नाला, विष्णू मंदिर, लिबर्टी तबेला ते दिव्या पॅलेस पर्यंतचा कच्चा नाला, माशाचा पाडा ते लक्ष्मी बाग पर्यंतचा कच्चा नाला ह्या तीन नाल्याचा ते गाळ काढणार आहेत आणि तो जो गाळ निघेल त्यांनी ते स्वतःच्या कामासाठी वापरणार.

**प्रेमनाथ पाटील :-**

खांबित साहेब, आता जो न्यु गोल्डन नेस्टच्या गटाराचा नाला आहे जो स्मशाना जवळ जात आहे. तो बंद करायला का घेतला आहे?

**जयंत पाटील :-**

उपायुक्त साहेब, त्याच्या पत्रानुसार आपण सभा घेतली. मग तुम्ही कॉस्टींग का काढली?

**मा. सभापती :-**

त्या नाल्याची माती तो कुठे टाकणार आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

३ लाख ९० हजाराची आपण कॉस्टींग का काढली?

**जयंत पाटील :-**

निश्चितच महानगरपालिकेचा फायदा होत आहे. हरकत नाही. पण आपल्या डायरेक्शननुसार आपल्याला जे करायचे आहे, जी गोष्ट ते झाले पाहिजे ना. नाहीतर इकडले शेण काढले, तो खड्डा ठेवला आणि तिथले शेण काढले असे होता कामा नये.

**दिपक खांबित :-**

त्या एजन्सी सोबत आपण ॲग्रीमेंन्ट करणार आहोत. बँक गॅरेंन्टी घेणार आणि त्याला आपण नाले आखून देणार.

**रतन पाटील :-**

उपायुक्त साहेब, त्याच्या संदर्भात आणखीन एक सुचना आहे. जे नाले वेडेवाकडे आहेत ते नाले सरळ करण्याचा प्रयत्न करा. वेडेवाकडे नाल्यामुळे सगळ्या पाण्यामुळे अडथळा येतो आणि पुर येतो. वेडेवाकडे जे नाले आहेत ते सरळ करण्याची मोहिम घेणार आहात की, नाही. की, कुठे अरूंद, कुठे रूंद हेच चालणार आहे का? आपले त्याबाबत काही धोरण नाही. मागच्या मा. महासभेमध्ये एकत्रित नाला विकास योजना केली.

**सुर्यकांत भोईर :-**

ते नैसर्गिक नाले आहे.

**रतन पाटील :-**

नैसर्गिक नाल्याबद्दलच बोलतोय.

**प्रभात पाटील :-**

नैसर्गिक नाल्यांना सरळ कसे करणार?

**मा. सभापती :-**

नदीला कसे सरळ करणार?

**रतन पाटील :-**

तिथे बांधकाम झालेली आहेत, मी दाखवतोय नाले झालेले आहेत. उघाडीचे बघा, उघाडीची कशी परिस्थिती आहे? तिथे लक्ष देउ नका. व्यवस्थित नाले कसे सरळ गेले पाहिजे. सरळ पाणी जाईल का? पुर परिस्थिती ह्याच्यामुळे येते. पुर परिस्थिती का येते ह्याच्यावर विचार केलेला आहे का? नुसते वरून पाणी येते आणि वाटेल तसे जाते. पुर परिस्थिती निर्माण होते ह्याला प्रशासन कारणीभुत आहे असे मी सांगतोय.

**प्रभात पाटील :-**

आता आपण ह्या विषयाला मान्यता दिली त्यात माझी अशी सुचना आहे की, त्याच्यामध्ये माशाच्या पाड्याचा उल्लेख आहे आणि बाकीच्या नाल्याचा उल्लेख आहे. तर आपण येथुन ते इथपर्यंत असे काहीतरी त्याचे उत्तर, त्याचे मोजमाप ठरवून द्या. कारण माशाच्या पाड्याच्या ठिकाणी, पर्सनल बोलले तरी हरकत नाही. आमची स्वतःची शेती आहे किंवा वाडी आहे. तिथली ही माती कोणी काढून नेउ नये.

**मा. सभापती :-**

वर पर्यंत नाले आहेत. ते माहित आहे.

**रतन पाटील :-**

माती नेलेली आहे.

**प्रभात पाटील :-**

माती नेलेली आहे. म्हणून सांगते की, त्यांना आपण एक लिमीटेशन दाखवून द्या. मी एक शेतकरी आहे आणि माझ्या सारखे तिथे अनेक लोक आहेत. तर त्यांच्या जागा जमिनीचे नुकसान होउ नये म्हणून तुम्ही त्यांना प्रमाण ठरवून द्या की, इथून तिथपर्यंत करा.

**मा. सभापती :-**

हा नाल्याचा विषय आहे आणि आपण कशाबद्दल बोलता?

**प्रभात पाटील :-**

आपण असे कसे बोलता?

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्य मिलन पाटील तुमची ही जमीन तिथे आहे, माझीपण जमीन आहे आणि ह्यांची ही जमीन आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हायवेच्या वर ज्या खाजगी जमिनी आहेत तिथे डिस्टब केले जाणार नाही. नॅचरल नाल्याची जेवढी विड्‌थ असेल तेवढाच तो नाला खोदेल.

**प्रभात पाटील :-**

तेच मी सांगते आपण त्यांना कार्य कक्ष ठरवून द्या.

**मिलन पाटील :-**

साहेब, आम्ही धंदेवाईक माणसे आहोत. आम्ही तुम्हाला सांगतो ह्या प्रकरणाला कसे वळन मिळेल हे लक्षात ठेवून द्या. मी जेव्हा रॉयल्टी आणायला जाईल. तेव्हा मी माशाच्या पाड्याचा सर्व्हे नंबर देईल. माशाच्या पाड्याची रॉयल्टी तुम्हाला सर्व्हे नंबर शिवाय मिळणार नाही. सर्व्हे नंबर मी ५० दिला पण आपला नाला ५० मध्ये येतो म्हणून मी सर्व्हे नंबर ५० दिला परंतु, ५० नंबर देताना माझी जमीन ५० मध्ये सुद्धा आहे, प्रायव्हेट मी त्याच्याकडून विकत घेतली तर ती आपल्याला त्याला बिनाखर्चाने महानगरपालिकेला पाहिजे म्हणून रॉयल्टी ताबडतोब बिनाखर्चाने मिळेल आणि मी माझ्या ५० नंबरच्या नाल्यामधून त्या नाल्याचे महानगरपालिकेला गाळ काढून देणार. परंतू, त्या ५० नंबरच्या सर्व्हेमधुन तो प्रायव्हेट वाल्याचीही माती सुद्धा काढू शकेल. तर ती माती काढल्याच्या नंतर रॉयल्टीचा त्याला फायदा होणार आहे आणि आपल्या नावे ती रॉयल्टी जाईल आणि तो करून घेईल ह्याची शक्यता आहे. म्हणून तो एरिया इंजिनिअरने आखून दिलेल्या मापाप्रमाणेच त्यांनी खोदकाम करायचे.

**मा. सभापती :-**

नाले असतील तेवढेच अन्यथा बाकी सगळे सोडून द्या. तसे ॲग्रीमेंन्ट करून घ्या.

**केशव घरत :-**

सभापती साहेब, हे हायवेच्या बाजूच्या लगतच्या नाल्याचे झाले पण हायवेपासून खाली जे घोडबंदर उघाडीपर्यंत जाणारा नाला आहे. हा अतिमहत्वाचा नाला आहे. तो कोण साफ करणार आहे आणि तो कधी साफ होणार आहे? आपला विषय झाला होता की, एप्रिल महिन्यामध्ये सगळे नाले साफ सफाई सुरू होईल. आता एप्रिल महिना संपलेला आहे.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

मा. सभापती साहेबांच्या मंजूरीने आपल्याला माहिती देतो की, तीन नाल्याशिवाय शहरातील जे मुख्य नाले आहेत ज्याची पावसाळ्या पुर्वी साफसफाई करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने सर्वकश असा प्रस्ताव तयार केलेला आहे आणि उद्याच्या मा. महासभेच्या सभेमध्ये प्रशासकीय मंजुरीसाठी विषय ठेवला.

**केशव घरत :-**

साहेब, प्रशासकीय मंजुरी घेतल्यानंतर काम किती दिवसांनी सुरू होईल?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तत्काळ जे सात दिवसाच्या मुदतीचे टेंन्डर आहे ते काढून मंजुरीसाठी आपल्या समोर लवकरात लवकर आणले जाईल.

**केशव घरत :-**

स्थायी समितीमध्ये आपला विषय झाला होता की, चे.सी. च्या उघाडीला चार दरवाजे आणि घोडबंदरला ते झालेले आहे.

**गजानन भोईर :-**

विषय झाला होता.

**केशव घरत :-**

ते झालेले आहे. खांबित साहेब, आपण ते काम बघा. नाहीतर इथे नाले वाढवले जातील आणि त्याच्या उघाड्या होउ शकत नाही.

**गजानन भोईर :-**

ते आता होउ शकत नाही. एक महिन्यात काय होईल?

**केशव घरत :-**

साहेब, तुमच्या निदर्शनात आणू इच्छितो की, आता सध्या खार लॅन्डवाल्यांनी बंदिस्ती सुरू केली आहे. बांधाची उंची वाढवायला लावली आहे. चार पाच ट्रॅक्टर त्यांचे दिवस रात्र सुरू आहे आणि जर आपण दरवाजे वाढवले गेले नाही तर अधिक जास्त पाणी साठेल. हे पण तेवढेच खरे आहे त्यावर लक्ष असु द्या.

**मा. सभापती :-**

लक्ष केंद्रीत करा.

**केशव घरत :-**

हा विषय बरोबर आहे. परंतु, आता जर त्या दरवाज्यांची वाढ झाली नाही तर पाण्याचा निचरा होणे फार अशक्य आहे. पाणी जास्त तुंबेल.

**मा. सभापती :-**

दोन्ही उघाडीला बाजुला खाड्या आहेत. म्हणून ते पहिले घ्या.

**गजानन भोईर :-**

खाड्या खोदायला पाहिजे.

**केशव घरत :-**

सभापती महोदय, चे.सी. च्या उघाडीची खाडी सुद्धा खोदली गेली पाहिजे. पण ती खोदली जात नाही. प्रत्येक वर्षी गाळ काढला जात नाही. ह्यावर्षी एकाच कोणा ठेकेदाराला हे काम न देता दोन्ही कडून काम सुरू करावे कारण त्या श्री. अजमल कडे एक पोकलन आहे. ते एका पोकलनने आठ दिवस येथे काम केले तर पंधरा दिवस जाफरी खाडीत जायचे. तेथून आठ दिवस काम केले की, परत घोडबंदरचा गाळ कुठेच पुर्ण निघालेला नाही.

**मा. सभापती :-**

हे काम लवकर चालू करतोय.

**केशव घरत :-**

परवा पासून मे महिना सुरू होत आहे आणि आपण ठराव केला होता की, एप्रिल महिन्यात काम सुरू करावे.

**गजानन भोईर :-**

दहा दिवसात खोदायचे काम सुरू कराल का? ते सांगा.

**मा. सभापती :-**

दहा दिवसात खोदायचे काम सुरू होईल.

**केशव घरत :-**

उघाड्यांचे काम सुद्धा झाले पाहिजे ना. तसाच प्रश्न आहे, बारकुंड साहेब आहेत घोडबंदरच्या बी. एस. ई. एस. च्या नाल्याच्या पाईपची उंची वाढलेली आहे त्या संदर्भात.

**रतन पाटील :-**

खतगावकर साहेब, मी दिलेल्या सुचनांचा निच्छितच विचार करा. जे वाकडे तिकडे नाले आहेत ते सरळ करण्याचा प्रयत्न करा. मागच्या वेळी नउ माणसे दगावली गेलेली आहेत. मिरा भाईंदर मध्ये प्राणहानी होते.

**मा. सभापती :-**

सन्मा. सदस्यांचे असे म्हणणे आहे तर नाल्याचा जो विषय आहे ना, चार - सात माळ्याची बिल्डींग तोडून नाले सरळ करा.

**रतन पाटील :-**

साहेब, आपण असे बोलू नका. नाले सरळ व्हायला पाहिजे. नाले कोणी अडवले, ह्याचे आपण बोलता ना की, कोणी जायला पाहिजे, ज्यांना माहिती आहे त्यांनी. मग तुम्ही का नाही गेले साहेब सभापती होते. नाले वाकडे तिकडे ज्याला पाहिजे तसे त्याने वळवले आहेत. त्यामुळे पाणी अडले जाते. नउ माणसे का मेली ह्याचा कधी तुम्ही विचार केला आहे का?

**सुर्यकांत भोईर :-**

सन्मा. सदस्य तेव्हा पुर आला होता.

**रतन पाटील :-**

कशासाठी पुर आला? कोणी असे काम केले? कुठले नाले बुजवले कुठले उघाड्या बुजवल्या ह्याचा कधी विचार केला का? आता आपण असे उत्तर देउ नका. जे असेल ते स्पष्ट बोला आम्ही काय, अलत - भलत बोलत नाही. नागरिकांच्या भल्यासाठी बोलतोय.

**मिलन पाटील :-**

सन्मा. सदस्य रतन पाटीलजी आपण एवढ्या पोटतिकडीने बोलता. मी सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, पुर परिस्थिती ही संपूर्ण महाराष्ट्रात माणसे मेली. फक्त भाईंदरचीच नउ माणसे मेली असे नाही.

**गजानन भोईर :-**

झाले ते झाले पण आता तरी शहाणे व्हा.

**रतन पाटील :-**

पुर परिस्थिती निर्माण व्हायला नको. त्याच्यासाठी आम्ही सुचना मांडतोय. आपण आमच्या सुचनांचा विचार करा.

( सभागृहात गोंधळ. )

**मा. सभापती :-**

सन्म. सदस्य रतन पाटील आपण फक्त वरच्या वर गोष्टी करता, आपण सांगितले सरकारी नाले जे आहेत त्याचा माझ्याकडे प्लान आहे. पण सरकारी नाल्यावरती इस्टेट एजन्ट कंपनीने कुळ लावून त्या जागा लोकांना विकल्या गेल्या हे तुम्हाला माहिती आहे का? २१५ नंबर मध्ये भरणी चालू आहे.

**रतन पाटील :-**

प्रशासन झोपलेले आहे, मला असे म्हणायचे आहे. नाल्यामधून जर माती काढली तर प्रशासन झोपलेले आहे का?

**मा. सभापती :-**

त्यांनी कुळ लावले तर तुमचे काय चालणार आणि माझे काय चालणार आहे?

**रतन पाटील :-**

नाले जर बुजवत असेल तर प्रशासनाने त्याच्यावर लक्ष द्यायला पाहिजे. आतापर्यंत सत्ताधारी झोपलेले आहेत का, असे मला म्हणायचे आहे.

**गजानन भोईर :-**

ह्याचा मालक कोण आहे?

**मा. सभापती :-**

सरकार.

**गजानन भोईर :-**

मालकाने ऑब्जेक्शन घ्यायला नको?

**मा. सभापती :-**

सरकार ऑब्जेक्शन घ्यायला जाईल ना, त्याच्या अगोदर कुल लावून पार पाडले आहे.

**रतन पाटील :-**

जर आपले नाले बंद होत आहेत, तर प्रशासन झोपले आहेत का? तुम्ही सत्ताधारी झोपा काढता का? नाले बुझवले जातात आणि पुर परिस्थिती निर्माण होते ह्याची जबाबदारी कोणाची? तुम्ही प्रशासनाला विचारा ना. आपण हे असे बोलू नका.

**गजानन भोईर :-**

सरकार मालक असताना सरकारची काही जबाबदारी नाही का?

**मा. सभापती :-**

केस लावा आणि केसला जा.

**गजानन भोईर :-**

तुम्ही केस लावा. महानगरपालिकेने केस लावा.

**रतन पाटील :-**

ही जबाबदारी प्रशासनाची आहे. आम्ही आपल्याला नाही, प्रशासनाला विचारायला पाहिजे.

**मिलन पाटील :-**

सभापती साहेब, सन्मा. सदस्य रतन पाटील हे विषय सोडून चर्चा करतच राहतील आपण पुन्हा विषय घ्यावा.

**रतन पाटील :-**

रतन पाटील त्याच्या घरचे बोलत नाही. तुमच्या अंगावर आले ना, लगेच रतन पाटील गप्प बस.

**प्रभात पाटील :-**

हे कोणाच्या एकाच्या अंगावर येणार नाही. सगळ्यांच्या अंगावर येणार. ह्या महापालिकेमध्ये सगळ्या पक्षाचे नगरसेवक आहेत.

**रतन पाटील :-**

ह्या सर्व ह्याला जबाबदार तुम्ही आहात. तुम्हाला माहिती आहे तर द्या ना आदेश.

**प्रेमनाथ पाटील :-**

सभापती साहेब, आपले जे काम चालू आहे टॉकिजचे त्या बाजूला मोठा नाला त्याच लाईनमध्ये आहे. तो भराव करायला घेतला त्याचे कारण काय आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतोय, सन्मा. सदस्य केशव घरत ह्यांनी जो विषय उपस्थित केलेला आहे. आपण, आयुक्त साहेब, मा. महापौर साहेबा आणि मी गर्व्हनिंग समितीमध्ये त्या ६७ लाखाच्या कामाला स्टेमची मान्यता घेतली त्यांनी तातडीने त्याच्या निविदा काढलेल्या आहेत. परंतू, निविदांची तारीख आहे ३ मे सबमिशन आहे आणि त्याच्यानंतर काम कधी होईल ते सांगता येत नाही. त्यांची प्रोसिजर त्यांनी केलेली, ३ मे टेंडरची लास्ट डेट आहे.

**सुर्यकांत भोईर :-**

म्हणजे पावसाळ्यानंतर काम चालू होईल.

**शिवाजी बारकुंड :-**

टेंडर आल्यानंतर पुढची प्रोसेस चालू होईल त्या ठरावाच्या कॉपीची वाट न पाहता मिटींग झाल्याच्या दुस-या दिवशीच त्यांना टेंडर काढायला सांगितले.

**मा. सभापती :-**

आपण ती कॉपी मला द्या. त्याबाबतीत मुख्यमंत्री महोदयांकडे माझी संध्याकाळी सभा आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आयुक्त साहेब, हा जो तुमचा विषय होता. नरेश म्हात्रे, गणेश ट्रान्सपोर्ट, साहेब असे आहे की उद्या जर कोणत्या ठेकेदाराने सांगितले की, मी महापालिकेला ह्याच्यापेक्षा जास्त पैसे देतो.

**मा. सभापती :-**

नंतर सांगितल्यावर त्याला काय अर्थ नसतो.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा तुमच्याकडे अचानक कसा काय आला? तुम्ही ह्यांना कॉल केले होते का?

**मा. सभापती :-**

माझ्याकडे आले नव्हते.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपल्याकडे नाही, आयुक्त साहेबांकडे.

**मा. सभापती :-**

जर असा कोणी चांगला प्रस्ताव आपल्याकडे आणला तर त्यांना त्याप्रमाणे नाले साफ करायला द्यायचे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उपायुक्त साहेब, असे आहे की, हा जो कच्चा नाला आहे ह्याच्यामध्ये आपण म्हणता की गाळ तर गाळ नाही ह्याच्यामधून भरपूर माती निघेल आणि कोणताही गाळ विकासकर्ते घेत नाही. तो फक्त माती काढणार आहे आणि अननेसेसरली.....

**गजानन भोईर :-**

ठराव तर झाला आहे तर कशाला ह्याच्यावर वाच्यता करायची?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यापेक्षा जास्त पैसे वाचतील.

**मा. सभापती :-**

श्री. नरेश म्हात्रे आहेत, त्यांच्या घरालाच लागून नाला आहे तो पूर्ण बंद झालेला आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजेच त्यातून माती निघेल ना. गाळ निघणार नाही. म्हणजेच त्याला आपण माती काढायला परवानगी दिली. तर उद्या दुसरा ठेकेदार जास्त पैसे देउ शकेल. तुम्ही निविदा काढा. ह्याच्यापेक्षा जास्त पैसे तुम्हाला मिळतील.

**गजानन भोईर :-**

विषय संपला त्यांना त्याच्यातच पैसा आहे.

**रतन पाटील :-**

महानगरपालिकेचे कामही होत आहे आणि चार लाख रूपये पालिकेचे वाचतात.

**प्रभात पाटील :-**

उपायुक्त साहेब, मला फक्त एवढे बोलायचे आहे की, रोजची स्थायी समिती आणि आजच्या स्थायी समिती मध्ये काही चेहेरे नवे दिसतात. म्हणजे नविन नियुक्ती आहे. उदा.समोर जे बसले आहेत ते ह्याच्या अगोदर श्री. शिरवळकर आहेत, श्री. मोरे आहेत. ते आज स्थायी समितीमध्ये आले आहेत तर काय पोस्टने आले आहेत? त्यांची काय नविन पोस्टींग झाली. हे कळले पाहिजे ना.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ह्याचा खुलासा करतो, आपण ज्या अधिकाऱ्यांना प्रमोशन दिलेले आहे त्यांना त्यांच्या कामाचे वाटप दिलेले आहे आणि त्याबाबतचे आदेश निर्गमित केलेले आहेत. त्याची प्रत मा. स्थायी समितीचे सभापती, मा. महापौर सर्वांकडे पाठविली आहे. त्यामुळे त्या त्या अधिकारात ते आलेले आहे.

**प्रकरण क्र. ०७ :-**

राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील पुर्व भागातील गाळ काढणेकरिता परवानगी देणेबाबत.

**ठराव क्र. ०७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या प्रभाग क्र. ११ मधील विशेष करुन संजय गांधी उद्यानाच्या डोंगराळ भागातून, मोठ्या प्रमाणावर येणाऱ्या पावसाचे पाणी राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ च्या पुर्व बाजू असलेले काशिमिरा, महाजनवाडी, लिबर्टी तबेला व माशाचा पाडा आदी भागात नैसर्गिक कच्च्या नाल्यातून निचरा होत असतो. सदर नाल्यातील गाळ माती स्वखर्चाने मे. गणेश ट्रान्सपोर्टचे मालक श्री. नरेश म्हात्रे यांनी पावसाळ्यापुर्वी खालील ठिकाणचे नाले खोदुन गाळ माती काढणे बाबत परवानगी मागीतली होती.

१) महाजनवाडी (विष्णु मंदिर) ते गावदेवी कंपाउंड पर्यंतचा कच्चा नाला.

२) लिबर्टी तबेला ते दिव्या पॅलेस पर्यंतचा कच्चा नाला.

३) माशाचा पाडा (खदाम) ते लक्ष्मीबाग पर्यंतचा कच्चा नाला.

वर नमुद केलेल्या कच्च्या नाल्यातील गाळ, माती स्वखर्चाने काढण्यास मे. गणेश ट्रान्सपोर्ट यांचे मालक श्री. नरेश म्हात्रे करणार आहे. त्यामुळे महापालिकेच्या नाले सफाई कामावर होणारा खर्चात बचत होऊन आर्थिक फायदा होणार आहे. सदर परवानगी देताना संबंधिताबरोबर माती गाळ काढण्याचा करारनामा करुन घेण्यात यावा व सदर कामावर बांधकाम विभागातील एक कनिष्ठ अभियंता व आरोग्य विभागाच्या स्वच्छता निरिक्षक यांची नेमणुक करुन त्यांचेवर देखरेख करण्यात यावीत. तरी ही सभा मे. गणेश ट्रान्सपोर्टचे मालक श्री. नरेश म्हात्रे यांना माती गाळ काढणे कामी परवानगी देत आहे.

**सुचक :- श्री. सुर्यकांत भोईर.** **अनुमोदन :- श्री. केशव घरत.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ०८ चे वाचन केले.)

**प्रभात पाटील :-**

मंजुर आहे त्यांना भत्ता देण्यात यावा. उपसभापतींना गाडी देतो आणि ह्या वर्षीच्याही उपसभापतींना आपण गाडी दिलेली आहे.

**गजानन भोईर :-**

जुने असल्यामुळे त्यांना तुम्ही भत्ता द्या. आमचे काय म्हणणे नाही. फक्त त्याला आमचा विरोध आहे. आमचा विरोध आहे. आमचा विरोध नोंदवा.

**प्रभात पाटील :-**

कशासाठी विरोध करता?

**गजानन भोईर :-**

आम्ही मागेपण सांगितले होते की, त्यांना देउन टाका. परत विषय आणायची गरजच नव्हती.

**सुर्यकांत भोईर :-**

तेव्हा विषय तहकूब झाला होता.

**कैलासबेन जानी :-**

तुमच्या हिशोबाने द्या.

**जयंत पाटील :-**

देउन टाका आणि विरोध नोंदवता.

**गजानन भोईर :-**

आमचा विरोध आहे. तुमच्या ह्याच्या खाली असेल, तुम्ही देउन टाका. कायद्यात जे असेल ते तुम्ही करा. पण आमचा विरोध नोंदवा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

उपायुक्त साहेब, प्रशासनाची भुमिका काय?

**मिलन पाटील :-**

चांगल्या कामाला प्रत्येकवेळी तुमचा विरोधच असतो.

**गजानन भोईर :-**

चांगल्या कामाला विरोध नसतो. पण जिथे विरोध करायचा आहे तिथे विरोध करू.

**मिलन पाटील :-**

आम्ही बहूमताने तो विषय पास करू. प्रश्न तो नाही. तुमची आम्हाला आवश्यकता भासणार नाही.

**रतन पाटील :-**

मग तुमच्या हिशोबाने द्या.

**कैलासबेन जानी :-**

तुमच्या हिशोबाने करा जर आमची आवश्यकता भासत नसेल तर पण आमचा विरोध नोंदवा.

**गजानन भोईर :-**

आमच्या चार सदस्यांचा विरोध नोंदवा.

**ग्रिटा फॅरो :-**

कशासाठी विरोध?

(सन्मा. सदस्य श्री. प्रेमनाथ पाटील ह्यांनी प्रकरण क्र. ०८ चा सभागृहासमोर ठराव मांडला.)

**एस्. ए. खान :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**जयंत पाटील :-**

सभापती साहेब, हा ठराव झाला दि. २६/०६/२००५ ला होत आहे. त्याच्यामध्ये आपण असा उल्लेख केलेला नाही. तो करायला पाहिजे होता.

**मिलन पाटील :-**

चुकीची दुरूस्ती करून ठराव पास करा.

**प्रेमनाथ पाटील :-**

आठ दिवसानंतर वाहन भत्ता मिळावा म्हणून त्यांनी आपल्याकडे पत्र दिलेले आहे ना आणि नंतर रिटायर्ड झाल्यावर तुम्ही सांगता की पदावरून उतरल्यावर त्यांना कसे द्यायचे असेच बोलता ना.

**जयंत पाटील :-**

प्रश्न तो नाही.

**प्रेमनाथ पाटील :-**

त्यांचा तो प्रश्न आहे.

**गजानन भोईर :-**

आमचा ह्या ठरावाला विरोध आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

तेव्हा त्यांनी मागणी केलेली आहे.

**कैलासबेन जानी :-**

एक वर्ष ते त्या पदावर होते आणि पदावरून उतरल्यावर मागितल्यानंतर कसे मिळेल?

**एस. ए. खान :-**

उपसभापतींनी नियुक्त केल्यानंतर आठ दिवसांनी त्यांनी मागणी केली होती.

**जयंत पाटील :-**

तुम्हाला या ठरावामध्ये दुरूस्ती करायला लागेल आणि ठराव व्हायच्या अगोदरपासून जे सभापती, उपसभापती होतील त्यांना ही द्यायला आमची हरकत नाही. असे त्या ठरावात नोंद करा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्या ठरावामध्ये अशी एक उपसुचना घ्या की, जर समजा उद्या बायचान्स काय झाले तर त्याची आर्थिक जबाबदारी प्रशासनावर राहील. ऑडीटमध्ये ऑब्जेक्शन निघाले तर ह्याची जबाबदारी प्रशासनावर राहील.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ऑडीट ऑब्जेक्शनचा विषय नाही. सन्मा. सभापती साहेबांच्या मंजुरीने या ठिकाणी मी खुलासा करतो की, सन्मा. पदाधिका-यांना जो वाहन प्रतीपुर्ति भत्ता देण्याचा आपला निर्णय झालेला आहे. त्याची आपण अंमलबजावणी करत आहोत त्यात कुठलेही दुमत नाही. त्यापुर्वीचा हा प्रस्ताव असल्यामुळे त्याची मागणी

असल्यामुळे ही विशेष बाब म्हणून प्रशासनाला निर्णय न घेता येत असल्यामुळे स्थायी समितीसमोर प्रशासनाने हा विषय आणला होता. यात जर आपण मान्यता दिली तर त्याप्रमाणे विशेष बाब म्हणून कार्यवाही करता येते. त्यात कुठला ऑडीटचा विषय येणार नाही. आपण म्हणाल्याप्रमाणे हा आजचा विशेष ठराव होईल की, ही मागणी पुर्वीची असल्यामुळे व त्यावेळेस त्यांनी स्वतःचे वाहन वापरल्यामुळे आणि त्यांनी आपल्याकडून पैसे न घेतल्यामुळे आता आपण त्यासाठीच मान्यता देत आहोत.

**जयंत पाटील :-**

मग त्या ठरावामध्ये दुरूस्ती कशी काय करणार?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

दुरूस्ती म्हणण्यापेक्षा हा ठरावच वेगळा होईल. विशेष बाब म्हणून, ह्यांचा आपण त्यावेळेस विचार केलेला नाही. आता हा आपण निर्णय करतोय.

**गजानन भोईर :-**

करा दुरूस्त्या.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्या ठरावाशी ह्याचा संबंध नाही. त्या ठरावात तसा उल्लेख नव्हता. म्हणून हा प्रस्ताव आलेला आहे.

**जयंत पाटील :-**

मागील उपसभापतींना द्यायला हरकत नाही.

**एस. ए. खान :-**

डासांसाठी काय नविन औषध आहेत?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याची कार्यवाही सुरू केली आहे.

**एस. ए. खान :-**

कुठे केली? काय करता, त्याचा काही एक पत्ता लागत नाही.

**कैलासबेन जानी :-**

भारतीय जनता पार्टीच्या चार जणांचा विरोध आहे अशी नोंद करा.

**एस. ए. खान :-**

मिरा रोडला कुठे चालू आहे?

**केशव घरत :-**

साहेब, कुठल्या पद्धतीने फवारणी करणार आहोत? त्याचा आम्हाला खुलासा करा.

**एस. ए. खान :-**

आपण काय दाखवत नाही व तिथे ठेकेदार भेटत नाही. तो सांगत नाही. कुठे काय करतोय.

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या संदर्भात आपण रजिस्टर मेनटेन करा आणि संबंधित नगरसेवकांना प्रोग्राम द्या.

**एस. ए. खान :-**

प्रोग्राम दिले नाही. काहीच माहिती दिली नाही.

**प्रकरण क्र. ०८ :-**

मा. सौ. उमा विश्वनाथ सपार, माजी उप सभाती, महिला व बालकल्याण समिती यांना कार्यालयीन वाहन प्रतिपुर्ती भात्ता (वाहना ऐवजी) अदा करणेस मंजुरी मिळणेबाबत. (मा. स्थायी समिती सभा दि. १४/०२/२००६ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. २०६)

**ठराव क्र. ०८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मा. नगसेविका सौ. उमा विश्वनाथ सपार ह्या दिनांक ०२/०७/२००४ ते दि. ०१/०७/२००५ या बारा महिन्याच्या कालावधीत महिला व बालकल्याण समितीच्या उप सभापती म्हणून कार्यरत होत्या. त्यांना समितीच्या दैनंदिन कामकाज व महानगरपालिका क्षेत्रात समितीच्या कक्षेतील कामकाजाकरिता महानगरपालिकेचे कोणतेही वाहन (कार) उपलब्ध न झाल्याने त्यांनी स्वतःचे वाहन वापरले व त्यापोटी झालेल्या खर्चाची प्रतिपुर्ती मिळणेकरिता महानगरपालिकेस विनंती केली आहे.

मा. स्थायी समितीने ठराव क्र. ७३, दि. २६/०७/२००५ अन्वये महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांना वाहनाऐवजी वाहन प्रतिपुर्ती भत्ता म्हणून रु. १७,०००/- (अक्षरी रुपये सतरा हजार मात्र) प्रती माह इतकी रक्कम अदा करणेचा निर्णय घेतला आहे व त्यानुसार कार्यवाही सुरु आहे. मा. नगरसेविका सौ. उमा विश्वनाथ सपार यांचा उप सभापती महिला व बालकल्याण समिती पदाचा कार्यकाल उक्त ठराव पारीत होणे अगोदरचा असल्याने त्याबाबत मा. स्थायी समितीची स्वतंत्र मंजरी मिळणे आवश्यक आहे.

मा. नगरसेविका सौ. उमा विश्वनाथ सपार यांना त्यांच्या उप सभापती, महिला व बालकल्याण समिती पदाच्या दिनांक ०२/०७/२००४ ते दि. ०१/०७/२००५ या बारा महिन्याच्या कालावधीकरीता प्रती माह रु. १७,०००/- असे एकुण रु. २,०४,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख चार हजार मात्र) इतकी रक्कम स्वतंत्ररित्या अदा करणेंस ही स्थायी समिती सभा आर्थिक व प्रशासकिय मंजुरी देत आहे.

## ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य

१) श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे
२) श्री. मोहन मधुकर पाटील
३) श्री. जयंत महादेव पाटील
४) श्री. मिलन गोविंदराव पाटील
५) श्री. सुर्यकांत अनंतराव भोईर
६) श्री. केशव रामभाऊ घरत
७) श्री. प्रेमनाथ गजानन पाटील
८) श्रीम. प्रभात प्रकाश पाटील
९) श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो
१०) श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील
११) श्री. शफिक अहमद खान
१२) श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस

## ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य

१) श्रीम. जानी कैलाशबेन दिनेशचंद्र
२) श्री. रमेश धरमचंद्र जैन
३) श्री. रतन कृष्णा पाटील
४) श्री. भोईर गजानन लक्ष्मण

| | | |
|---|---|---|
| ठरावाच्या बाजुने असलेले सदस्य | - | १२ |
| ठरावाच्या विरोधात असलेले सदस्य | - | ०४ |
| तटस्थ सदस्य | - | ०० |
| ठरावाच्या वेळी एकुण उपस्थित सदस्य | - | **१६** |

**सुचक :- श्री. प्रेमनाथ पाटील.** **अनुमोदन :- श्री. एस्. ए. खान.**

**ठराव बहुमताने मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. ०९ चे वाचन केले.)

**प्रकरण क्र. ०९ :-**

मा. आयुक्त सो. ह्यांनी मंजुर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करणे. (आरोग्य विभाग)

**ठराव क्र. ०९ :-**

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरीता अळी नाशके खरेदी कामी दै. नवशक्ती, दै. सागर ह्या वृत्तपत्रात निविदा नोटीस प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर निविदेस प्रतिसाद मिळून मे. रमेश ॲग्रो केमा कॉर्पोरेशन, मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन, मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पोरेशन, मे. रिद्धीका एन्टरप्रायजेस, या निविदाकारांनी निविदा सादर केल्या आहेत. निविदांचा तांत्रिक लिफाफा क्र. १ व दराचा लिफाफा क्र. २ उघडण्यात आले.

उपरोक्त निविदाकारांनी खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| क्र. | अळी नाशकाचे नांव | मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पो. | मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पो | मे. लक्षता ट्रेडींग कॉर्पो. | मे. रिद्धीका एन्टरप्रायजेस |
|---|---|---|---|---|---|
| १ | फेन्थीऑन ८२.५ टक्के | **रु. १६००/- प्रती लिटर** | रु. १६३५/- प्रती लिटर | रु. १६८५/- प्रती लिटर | मे. १६८०/- प्रती लिटर |
| २ | डेल्टामेथ्रीन २.५ टक्के फ्लो | रु. १३५०/- प्रती लिटर | रु. १५५०/- प्रती लिटर | रु. ९००/- प्रती लिटर | **रु. ८९०/- प्रती लिटर** |
| ३ | डेल्टामेथ्रीन १.२५ टक्के यु.एल.व्ही. | **रु. १४४५/- प्रती लिटर** | रु. १६००/- प्रती लिटर | रु. १९००/- प्रती लिटर | रु. १८९८/- प्रती लिटर |

वरीलप्रमाणे तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता मे. रमेश ॲग्रो केम कॉर्पोरेशन यांनी अनु. क्र. १, अनु. क्र. ३ व मे. रिद्धीका एन्टरप्रायजेस यांनी अनु. क्र. २ ह्या अळी नाशका करीता निविदे मध्ये सादर केलेले सर्वात कमी दर स्विकारण्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये मा. स्थायी समितीने अवलोकन केले.

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**केशव घरत :-**

सभापती महोदय, मला इतिवृत्त संदर्भात काही प्रश्न विचारायचे होते. ते आम्ही तिथे गेल्यामुळे राहिलेत. ते आत्त विचारु का? कार्यवाहीचे बरेचसे प्रश्न आहेत. ११३, ११४ त्यांचे लायसन्स दाखवणार होते त्याचे काय झाले? ते आम्हांला कुठे दाखवलेच नाही

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिवजी, आमची उपसुचना ठरावामध्ये नमुद करुन घ्या.

**मा. सभापती :-**

सुरक्षा रक्षकांचा आपण विषय घ्या.

**केशव घरत :-**

साहेब, दुसरा प्रश्न असा होता की, बारा वर्षाची कालबद्ध वेतनश्रेणी काही कामगारांना मिळाली नाही. त्याचे काय?

**बालाजी खतगावकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

कालबद्ध वेतनश्रेणी ह्या पंधरा दिवसांत दिली जाईल.

**केशव घरत :-**

आपले असे ठरले होते की, सेवाजेष्ठतेनुसार नोकरी देण्यांत यावी. म्हणजे पदोन्नती देण्यात यावी. परंतु, ११ माणसांची भरती होणार होती ती कुठल्या पद्धतीने?

**मा. सभापती :-**

अवलोकनाचा विषय झालेला आहे. या सभेला आपण सर्व आलात याबद्दल सर्व उपस्थित सन्मा. सदस्या, सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग ही सभा खेळीमेळीच्या वातावरणामध्ये पार पडल्यामुळे आपणां सर्वांना धन्यवाद. मी प्रशासनाला एक सांगू इच्छितो की, रस्त्यावर फेरीवाले जे ना-फेरीवाला रस्त्यावर बसलेले आहेत त्यांच्यावर ह्या आठवड्यात कार्यवाही न केल्यास आम्हांला या स्थायी समितीला ह्याच्यावर खोल विचार करावा लागणार आहे. आजची सभा संपल्याचे मी जाहिर करीत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०२.१० वाजता.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**